# जादूची पिशवी

नासा येवतीकर



# या मित्रांनो! घेऊन जा! लुटा! लुटा! लुटून न्या!

# जादूची पिशवी

## हे पुस्तक फ़ुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

पण तरीही आम्ही ते वाचकांना विनामूल्य घेऊ देतो.

कारण ई पुस्तक एकदा बनलं की एकजण वाचो वा एक लाख.

आमचं काहीच कमी होत नाही.

उलट आनंद वाढतो, मजा येते.

पण

तुम्ही ते फ़ुकट का घ्यावं?

तुम्हालाही काही देता येईल.

असे काही द्या ज्याने ई साहित्यच्या लेखकांना, टीमला आणि तुम्हाला आनंद मिळेल

आणि तुमचं काहीच कमी होणार नाही.

तुम्ही आशिर्वाद आणि शुभेच्छा द्या

लेखकांना फ़ोन करून दाद द्या

आपल्या मित्रांचे मेल पत्ते आम्हाला द्या

मित्रांना आमच्याबद्दल मेल आणि Whatsapp करा

ई साहित्यचे फ़ेसबुक पेज, इन्स्टाग्राम, टेलिग्राम यांवर स्वत: जा व इतरांना आमंत्रित करा. सोशल मिडियावर ई साहित्यचा प्रचार करा.

सर्वात बहुमोल अशा तुमच्या सूचना द्या

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत ज्याने लेखकाला व ईसाहित्य टीमला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होईल. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे व त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा. अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

कथासंग्रह

# जादूची पिशवी

लेखक: नागोराव सा. येवतीकर (नासा)

# जादूची पिशवी

## लेखक : नागोराव सा. येवतीकर ( नासा )

पत्ता : मु. येवती पोस्ट येताळा,
ता. धर्माबाद जि. नांदेड
मोबाईल क्रमांक :- 9423625769
Email id - nagorao26@gmail.com
Blog address - http://nasayeotikar.blogspot.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author’s copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान :

www.esahity.com

www.esahity.in

esahity@gmail.com

प्रकाशन : २५ मार्च २०२१

©esahity Pratishthan®2021

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

# ना सा येवतीकर



शिक्षकी पेशाकडे काही शिक्षक उपजीविका म्हणून पहातात तर काही जीविका म्हणून पहातात. शिकवणं हाच त्यांच्या जीवनाचा मूलाधार असतो. नासा सर या दुसऱ्या प्रकारचे शिक्षक आहेत. हाडाचे. त्यांच्या रक्तात लाल, पांढऱ्या पेशींबरोबरच खडू आणि फ़ळयाच्या काळया पांढऱ्या पेशीसुद्धा सापडतील असे अस्सल शिक्षक.

व्यवसायाने ते प्राथमिक शिक्षक (जिल्हा परिषद प्राथमिक कन्याशाळा, धर्माबाद, ता. धर्माबाद, जि. नांदेड) आहेत.

शालेय जीवनापासुनच लिखाण करण्याची फारच आवड होती त्यामुळे आजपर्यंत विविध वर्तमानपत्र, दैनिक, साप्ताहिक, मासिकात 900 च्या वर वैचारिक लेख प्रसिद्ध झाले आहेत. जीवन-शिक्षण या शैक्षणिक मासिकातून सुध्दा यापूर्वी लेख

प्रकाशित झाले आहेत. दैनिक लोकपत्रमध्ये दर सोमवारी ऑफ पिरियड सदराखाली एक वर्ष स्तंभलेखन केले आहे, ज्यात शैक्षणिक विषयी विचार मांडले होते.  लहान मुलांसाठी सुध्दा छोटेखानी लेख लिहिले असून मनोरंजनातून शब्दसंपत्ती वाढवी यांसाठी विविध मनोरंजक शब्दकोडे तयार केले आहे. जे की दैनिक देशोन्नतीच्या फनक्लब पेजवर प्रकाशित झाले आहेत.  यापूर्वी ई साहित्यमधे यापूर्वी याच ई साहित्यच्या मदतीने संवेदना, मी एक शिक्षक, जागृती, शाळा आणि शिक्षक, हिंदू सण, रोज सोनियाचा दिनू हे वैचारिक लेख असलेले ई बुक, सारीपाट कवितासंग्रह आणि हरवलेले डोळे, कुलदीपक हा ई कथासंग्रह प्रकाशित करण्यात आले आहे. कविता करण्यासोबत लघुकथा लिहिण्याचा छंद देखील गप्प बसू देत नाही. म्हणूनच हा कथासंग्रह आपल्या हाती देतांना विशेष आनंद होत आहे. काव्यांगण रोज एक कविता नावाचा नवोपक्रम खास शालेय विद्यार्थ्यांसाठी राबविला आहे. या संग्रहात मानवी जीवनाच्या विविध पैलूंवर प्रकाश टाकणाऱ्या व्यक्तिमत्वाविषयी लेखन केले आहे जे की वाचकांना नक्की आवडतील. विद्यार्थ्यांना सतत नाविन्यात रमववण्यासाठी ते विविध उपक्रम तयार करतात आणि त्यां उपक्रमाच्या माध्यमातून शिकविण्याचा त्यांचा प्रयत्न असतो. नासा सरांचे अजून एक

वैशिष्ट्य आहे. लोकांना लिहिते करण्याचा ते सदैव प्रयत्न करत असतात. त्यासाठी ते अद्ययावत साधनांचाही वापर करतात.

नासांचे आठवे पुस्तक “कुलदिपक” हा कथासंग्रह प्रसिद्ध करताना आम्हाला अभिमान वाटतो. या कथासंग्रहातील कथा या संस्कारक्षम मुलांसाठी तर आहेतच पण मोठ्यांनाही आवडतील. कृपया आपले अभिप्राय नासा सरांना कळवा. त्यांचा संपर्क क्रमांक 9423625769 असून nagorao26@gmail.com हा त्यांचा मेल पत्ता आहे.

नासा हे सातत्यपूर्ण लेखक आहेत आणि आपले लेखन ते नियमित रित्या ब्लॉगवर प्रसिद्ध करत असतात. त्यांचा http://nasayeotikar.blogspot.com हा ब्लॉग तुम्हाला नक्की आवडेल. त्यांच्या संपर्कात रहा. तुमचे विचार त्यांच्यापर्यंत पोहोचवा. नासांच्या तळमळीने चाललेल्या नवभारतनिर्माणात आपण सामिल व्हा.

आम्ही तर आहोतच.

सुनील सामंत

टीम ई साहित्य प्रतिष्ठान

# जादूची पिशवी

## कथासंग्रह

सदरील कथासंग्रहामधील सर्व कथा ह्या काल्पनिक असून कथेतील नावं, स्थळं आणि पात्र हे देखील काल्पनिक आहेत. कदाचित  या कथेतील नावे आणि पात्र वास्तवातील कोणाशी जुळत असतील तर तो निव्वळ योगायोग समजावा.

## अर्पण पत्रिका

या कथा संग्रह निर्मितीसाठी प्रत्यक्ष अप्रत्यक्षरित्या प्रोत्साहित करणारे माझ्या असंख्य वाचक मित्रांसह आई-वडील, पत्नी आणि मुलांना अर्पण ...........

# मनोगत

समर्थ रामदास स्वामी यांच्या वचनानुसार दिसामाजी काही तरी लिहावे. म्हणून रोज काही ना काही लिहिण्याचा प्रयत्न केला. यातून वैचारिक लेख आणि कविता लिहिता लिहिता, लघुकथा लिहिण्याचा ही छंद लागला. हरवलेले डोळे नावाचा पहिला कथासंग्रह प्रकाशित झाल्यानंतर कुलदीपक नावाचा हा कथासंग्रह नुकतेच आपल्यासमोर सादर झाले आहे. जादूची पिशवी हा तिसरा कथासंग्रह आपल्यासमोर सादर करत आहे. या कथासंग्रहात एकूण 18 कथा आहेत. ज्यात अति हव्यासापोटी  माणसाची फसवणूक कशी होते याची एक कथा आहे. ग्रामीण भागात राहणाऱ्या गोट्या या मुलाच्या काही आठवणी आणि त्यांच्याशी निगडित काही कथांचा यात समावेश केला आहे, ज्यामुळे वाचकांना जुन्या आठवणी परत एकदा आठवण येतील. मुलींचे जन्म दिवसेंदिवस कमी होत आहे. यावर आधारित दोन कथांचा यात समावेश केला आहे. धैर्यावर आधारित एक कथा लिहिण्याचा देखील छोटासा प्रयत्न केला आहे. जीवनात आत्मविश्वस खूप महत्त्वाचे असते त्या अनुषंगाने देखील एक कथा वाचण्यास मिळणार आहे.

मला विश्वास आहे की, जादूची पिशवी नावाचा हा कथासंग्रह वाचकांना नक्की आवडेल. आपल्या कडू-गोड प्रतिक्रिया मला जरूर कळवावे.

आपलाच

नासा येवतीकर, धर्माबाद

9423625769

# अनुक्रमणिका


01) कळी उमलण्याआधी ....!

02) जिद्द

03) लॉकडाऊन

04) निरागस नामा

05) लालच बुरी बला है

06) कृतार्थ जीवन

07) संशय

08) गोट्या

09) चूक

10) धाडसी सुरज

11) बहिणीची शपथ

12) लेक वाचवा लेक शिकवा

13) भाषेचा प्रश्न

14) रेल्वेतील पहिला प्रवास

15) मेहंदी

16) जादूची पिशवी

17) एका मताची किंमत

18) कुस्ती

# १) कळी उमलण्याआधीच .....

घराला आज मांगल्याचे स्वरूप आले होते. सारेच जण अगदी आनंदात वावरत होते. फक्त गीताचे वडील पांडुरंगाला सोडून. नातेवाईकांना पाहून तो हसण्याचा प्रयत्न करत होता मात्र चिंतेची एक लकीर त्याच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होती. गीताचा छोटा भाऊ गणेश इकडून तिकडे उड्या मारण्यात व्यस्त होता. त्याला देखील नवा कोरा ड्रेस मिळाला होता त्यामुळे तो जाम खुश होता. घरात आज खूप पाहुणे आले होते आणि त्यांच्या सोबत आलेल्या लहान बच्चे कंपनीमुळे तो खरोखरच आनंदी झाला होता. गीता दीदीला आज नवरीसारखं सजवले होते म्हणून तो अधूनमधून तिला सारखं म्हणत होता, " दीदी आज तुझं लग्न आहे का? " पण दीदी या प्रश्नाला काहीच उत्तर देत नव्हती. गीताचे आत्या मामा मावशी काका हे सारे पाहुणे रात्रीच आलेले होते तर उर्वरित पाहुणे सकाळी सकाळी उतरले होते. निमित्त होतं, गीता दीदी मोठी झाली होती म्हणजे उपवर झाली होती. ही बातमी गीताच्या आईकडून पहिल्यांदा बाबाला कळाले. मग बाबांनी तसा निरोप पाहुण्यांना कळविले. एक तारीख निश्चित करण्यात आली, कार्यक्रम करण्याचा.

गीता ज्यादिवशी उपवर झाली त्यादिवसापासून तिचे बाहेर जाणे बंद करण्यात आले. ती गावातल्याच सातव्या वर्गात शिक्षण घेत होती. तिची शाळा देखील बंद झाली. शाळेतील मॅडम त्यांच्या घरी जाऊन त्यांची भरपूर समजूत काढली पण सारे व्यर्थ ठरले. घरातील वाडवडील मंडळीनी तिला शाळेत पाठविण्यास नकार दिले. तसं गीताच्या मनात शिकण्याची खूप इच्छा होती मात्र तिच्या इच्छेचा विचार करणारा कोणी नव्हता. मुलगी उपवर झाली की सर्वात जास्त चिंता आणि काळजी मुलीच्या बापाला होत असते. कधी एकदा तिचे हात पिवळं करावं असे त्याला होऊन जाते.

त्याला कदाचित कारण ही तसंच असू शकते की, रोजच्या पेपरमधल्या बातम्या वाचल्या की काळजात धस्स करतंय. मुलीचे लग्न होईपर्यंत बापाच्या काळजाला एक घोर लागलेले असते. कमी शिकलेल्या आई-बाबांना तर जरा जास्तच काळजी वाटायाला लागते. उपवर झालेल्या मुलीकडे गल्लीतले पोरं ही वाईट नजरेने पाहत असतात. गीताच्या बाबतीत ही तेच घडू नये म्हणून पांडुरंग काळजी करत होता.

कार्यक्रमात खूप पाहुणे, नातेवाईक, मित्रमंडळी आली होती. कोंबडे आणि बकरे कापून सर्वांना मेजवानी देण्यात आली. गीता

दिसायला सुंदर होती, त्यात आज अजून सुंदर दिसत होती. दृष्ट लागावी असे तिचे सौन्दर्य उजळून दिसत होते.

त्याच पाहुण्यामध्ये एक पाहुणा गीताला पाहून आपल्या घरची सून करून घेण्याची माहिती दिली. तशी ही माहिती पांडुरंगाच्या कानावर गेली. सारं कार्यक्रमाची आवरा आवर झाल्यानंतर गीताच्या आईला ही बातमी पांडुरंगाने सांगितली तशी ती देखील आनंदी झाली.

दुसऱ्या घरात बसून गीता हे सारं ऐकत होती. तिच्या मनात चलबिचल चालू झालं होतं. तिला काही तरी बोलायचं होतं, मात्र कोणाला बोलणार? ती मनातल्या मनात घाबरून गेली होती. दुसऱ्यांदा शाळेतील मॅडम तिला शाळेत घेऊन जाण्यासाठी आले होते, यावेळी मात्र आईने सरळ गीताचे लग्न ठरले आहे असे सांगितले. हे ऐकून मॅडमला धक्काच बसला. ते निमुटपणे शाळेत परत गेले. गीताला मॅडम शी बोलायचे होते मात्र तशी संधी मिळालीच नाही. एके दिवशी पाहुणे आले नि बघून गेले. ही फक्त औपचारिकता होती. गीता पसंद असल्याचा त्यांनी निरोप दिला. गीताच्या मनात काय आहे? याचा कोणी ही विचार केला नाही. पाहुण्याचं घर खूप मोठं होतं, त्यांचा एकुलता एक मुलगा होता,

भरपूर पैसा, धन दौलत होती. हे सारं पाहून पांडुरंग मागचा पुढचा विचार न करता स्थळ पसंद असल्याचे कळविले.

दिवसेंदिवस गीता विचारात गढून राहू लागली. उपवर होण्यापूर्वीची गीता आता दिसत नव्हती. निद्रानाश झाला होता, डोळे सुजल्यासारखे वाटत होते. ती मोकळया मनाने नाचू शकत नव्हती, फिरू शकत नव्हती. ती पार बंधनात अडकून पडली होती. काही वेडेवाकडे करावं तर आपल्या आई-बाबाचे काय? हा विचार करून ती शांत राहत होती. काही दिवसातच तिचे वयाच्या तेरा-चौदाव्या वर्षात लग्न झाले ते ही तिशीच्या वयातील पुरुषासोबत. गीता ही कोवळी पोर तर तो तिशीचा पुरुष. जोडा काही शोभून दिसत नव्हता पण असे स्थळ पुन्हा मिळणार नाही म्हणून पांडुरंगाने हे लग्न लावून दिले.

बापाची काळजी मिटली पण पोरीची चिंता सुरू झाली. तिला घरात कोणत्याच गोष्टीची काळजी नव्हती. सर्व काही सुख सोयी सुविधा होत्या. मात्र तिचा नवरा रोज पिऊन घरी यायचा. त्याला कशाचेही होश राहायचे नाही. त्याच धुंदीत तो गीतासोबत झोपायचा. तिला कधी प्रेमाचा एक शब्द देखील कधी बोलायचा नाही. लग्न झाल्यानंतर पाच सहा महिन्यात तिला गर्भ राहिलं. तिचं

वय किती आणि ती आता आई बनणार होती. ही बातमी ऐकून घरीदारी सर्वांना आनंद झाला.

मात्र गीताच्या चेहऱ्यावर कोणातच भाव दिसत नव्हता. नऊ महिने पूर्ण झाले होते गर्भाला. तिला खूप त्रास होऊ लागला होता. म्हणून ह्या वेदना अश्याच असतात म्हणत तिचे सांत्वन करू लागले. एके दिवशी खूपच वेदना होत होत्या म्हणून गावातीलच बाळंत करणाऱ्या बाईला बोलून आणण्यात आलं.  तिला वेदना असह्य होऊ लागल्या, त्याच त्रासात ती तडफडून शेवटी आपला देह ठेवला. गर्भ सुद्धा तिच्या सोबतच मेलं. दोन्ही जीव शांत झाले होते. वयाच्या पंधरा वर्षाच्या आत गीताचे जीवन संपुष्टात आलं. नशीबालाच दोष देत पांडुरंग रडत बसला होता. गीताची अंत्यविधी शाळेसमोरून जात असताना सारेच दुःखामध्ये डोळयात अश्रू आणून तिला पाहत होते. आई बाबांच्या अज्ञानामुळे अजून एक कळी फुलण्याआधीच गळून पडल्याचं दुःख मॅडमला होत होतं.

# 02) जिद्द

प्रकाश हा अभ्यासू, कष्टाळू आणि जिद्दी तरुण. जीवनात त्याने अनेक कष्ट, यातना आणि संकटांना तोंड दिले पण हार पत्करली नाही. तो लहान असतांनाच त्याचे वडील त्याला सोडून देवाघरी गेले. त्यावेळी प्रकाशला काही कळत देखील नव्हते. छोट्याशा गावात तो आईसोबत राहत होता. शेती तर नव्हतीच होतं एक घर ते ही झोपडीच. आई दुसऱ्याच्या शेतीत मोलमजुरी करून कसेबसे दिवस काढत असे. प्रकाश शाळेला जाऊ लागला, त्याची हुशारी आणि कष्टाळूवृत्ती शाळेच्या अभ्यासात दिसून येऊ लागली. एकेक वर्ष संपत जात होते. वर्ग वाढत होते तसे त्याच्या समोर अनेक संकटे उभे राहू लागले. गावात सातवी पर्यंतची शाळा होती तोपर्यंत शिक्षण घेणे सोपे गेले मात्र आठव्या वर्गाचे शिक्षण घेण्यासाठी त्याला गावापासून दूर जाणे आवश्यक होते. पाच किमी दूरच्या शाळेत त्याला चालत जाण्याशिवाय पर्याय नव्हता. सायकल विकत घेण्याइतके त्याच्याजवळ पैसे देखील नव्हते. तरी ही तो रोज न चुकता शाळेला जाऊ लागला. रोज पाच किमी जाणे आणि येणे असे दहा किमी तो चालायचा. प्रकाशला आता काही गोष्टीची जाणीव देखील होऊ लागली. आई ज्या शेतात कामाला जाते तेथे

सुट्टीच्या दिवशी तो ही जाऊ लागला. त्यामुळे चार पैसे जास्त मिळू लागले. वही, पेन आणि पुस्तकासाठी आईला त्रास द्यायचा नाही, आपला पैसा आपण कमवायचे आणि शाळा शिकायचं हे त्याने ठरवलं. त्याप्रमाणे तो दहावी देखील पास झाला. पण त्याला चांगले मार्क मिळाले नाही. तो दहावी पास झाला यातच तो आनंद मानत होता. आईला देखील खूप आनंद झाला. पुढील शिक्षणासाठी त्याला वीस किमी दूर तालुक्याच्या ठिकाणी जायचे होते मात्र समोर अनेक समस्या तोंड आ वासून होते. आई म्हणते बास झालं शिक्षण आता काही तरी कामधंदा बघ आणि कामाला लाग. पण प्रकाशला पुढे शिकायचं होतं. काय करावं हे त्याला सुचत नव्हतं. शेवटी त्याने शिकण्याचा मनाशी पक्का निर्धार केला आणि तालुक्याच्या ठिकाणी जाण्यासाठी निघाला. त्याच्या सोबत एक बॅग होती ज्याच्यात काही कपडे आणि आईने बांधून दिलेली शिदोरी होती. सुट्टीच्या काळात शेतात काम केल्यावर मिळालेली मजुरी म्हणून पन्नास शंभर रुपये होते. सकाळी सकाळी फाट्यावर गेला, काही वेळात बस आली. तो बस मध्ये बसला आणि शहराकडे निघाला. ते शहर काही नवीन नव्हते बऱ्याच वेळेला तो आई सोबत खरेदी करण्यासाठी येथे आला होता. तेथल्या कॉलेज मध्ये ॲडमिशन घेतलं. कॉलेजचेच हॉस्टेल होते आणि महिना तीस रुपये असा त्याचे भाडे होते जे की त्याला परवडत होतं. त्याने लगेच

हॉस्टेलमध्ये एक कॉट मिळवलं आणि त्याचे शिक्षण सुरू झालं. कॉलेज संपल्यावर काही तरी करायला हवं म्हणून तो सायंकाळच्या वेळी गावात फेरफटका मारायला निघाला. त्याला काही काम हवे होते मात्र असे पार्टटाइम काम कोण देणार? कोणी ही होकार देत नव्हते. शेवटी एका टाइप रायटरच्या दुकानात त्याला महिना वीस रुपये च्या बदल्यात नोकरी मिळाली. त्याचे तिथे काही जास्त काम नव्हते. टायपिंगकरण्यासाठीआलेल्या मुलांची नोंद करणे आणि त्यांची कागद त्याचा फाईल ला लावणे असे सोपे काम मिळाले. कॉलेज संपल्यावर तो रात्री नऊ वाजेपर्यंत तेथे थांबायचा आणि होस्टेलवर आल्यावर रात्री बारा एक पर्यंत अभ्यास करायचा. आईला काळजी नको म्हणून गावी गेल्यावर तो सुखात आणि आनंदात आहे असे सांगितले. अकरावी ते पदवी पर्यंतचे शिक्षण त्याने असेच पूर्ण केले. प्रकाश हुशार असल्यामुळे सगळया गोष्टी तो पटकन आत्मसात करत होता. ज्याठिकाणी तो पार्टटाइम काम करत होता त्याच ठिकाणी तो नोकरी करू लागला. त्याने आपली टायपिंगची परीक्षा देखील पास झाला होता. शहरातील अनेक टायपिंगची कामे त्याला मिळू लागली त्यामुळे त्याच्या हातात काही पैसा देखील येऊ लागला होता. त्या दुकानात राहून त्याची शहरात चांगली ओळख ही निर्माण झाली. स्वतःचे एक दुकान असावे म्हणून तो प्रयत्न करू लागला. बेरोजगार तरुणांच्या

हाताला काम देण्यासाठी शासनाचे अनेक योजना असतात असे तो ऐकून होता म्हणून त्याने अनेक ठिकाणी भेटी दिल्या मात्र सर्व प्रयत्न विफल ठरले. तो यामुळे खूपच नाराज झाला होता. त्याचे हॉस्टेल सुटले होते आणि शहरात एका भाड्याच्या खोलीत तो राहू लागला. त्याचे खायचे वांदे होऊ लागले. कमावलेला सारे पैसे यातच खर्च होऊ लागले. पुढे काय करावं? हे त्याला सुचत नव्हतं. पुढे येईल ते काम करत होता आणि चार पैसे मिळवीत होता. आईला आता शेतातले काम होत नव्हते म्हणून तो आईला आपल्या सोबत शहरात आणला. आई वृद्धावस्थेकडे झुकलेली, तिचा दवाखाण्याचा खर्च संकटात भर टाकत होती. पैसे कमविण्यासाठी त्याने अजून जिद्द सोडली नव्हती. त्याला चांगली टक्केवारी नव्हती म्हणून त्याने कधी सरकारी नोकरी मिळविण्यासाठी प्रयत्नच केला नाही. मात्र त्याच्या एका मित्राने त्याला हायकोर्टात क्लार्कच्या भरपूर जागा निघाले आहेत आणि यात तुला यश मिळू शकते असा सल्ला दिला. वशिलेबाजी आणि पैसा याशिवाय नोकरी मिळत नाही आणि ते दोन्ही गोष्टीमाझ्याजवळ नाहीत असे तो मित्राला म्हणाला. पण मित्राने जबरदस्तीने त्याला अर्ज करायला लावला. काही दिवसांनी त्याची परीक्षा देखील झाली. दिलेली परीक्षा तो विसरून ही गेला कारण त्याला माहीत होतं की यात आपण यशस्वी होणार नाही. पण इथे

मात्र त्याचं नशीब फळफलं त्याला हायकोर्टात क्लार्कच्या पदाची नोकरीचे पत्र आले आणि तो आनंदात नाचू लागला. त्या मित्राला त्याने सर्वप्रथम धन्यवाद दिले ज्याने याचा अर्ज भरला होता. आईच्या कष्टाचे आज खरे चीज झाले असे त्या माऊलीला वाटले. त्याची मेहनत, जिद्द आणि चिकाटी वृत्ती कामाला आली ज्यामुळे तो जीवनात यशस्वी झाला.

# 03) लॉकडाऊन

आई, लई भूक लागली, काही तरी दे की खायला ...? ' भुकेच्या व्याकुळेने लहान पोरं ओरडून ओरडून आईला सांगत होती. ती आई तरी काय देणार बिचारी, घरात होतं नव्हतं सर्व संपलं होतं, खायला तिचं शरीर तेवढं राहिलं होतं. ती देखील शून्य नजरेने घराच्या छताकडे पाहत होती. तिच्या पोटात देखील कावळे ओरडू लागले होते, भूक लागली म्हणून ती कोणाला सांगणार होती? तिचा धनी बाजारात गेला होता काही खायला मिळेल का याचा शोध घेण्यासाठी. तास दोन तास झाले तरी धनी काही येत नव्हता, ती आपल्या बाळाची समजूत काढत होती, ' रडू नको माय, येतीलच बाबा आता, काही तरी घेऊन.....!' सायंकाळची रात्र झाली. पोरं रडून रडून तशीच झोपली. रात्र वाढत होती, ती आपल्या धन्याची वाट पाहत होती. रात्री दहा वाजले असतील त्या वेळी दारावर कोणीतरी लंगडत लंगडत येत असल्याचे तिला जाणीव झाली. तसं ती बाहेर आली, बघते तर काय तो तिचा धनीच होता. त्याला धड चालता देखील येत नव्हते, तो कण्हत कण्हत येत होता. घरात पोटाला खायला पैसे नाहीत, मेला आज भी दारू पिऊन आला, मेल्याला दारूला पैसे भेटतात पण घरात लेकराला खाऊ

घालायला काही भेटत नाहीत, अशी मनात ती कुरकुर करू लागली. ती धन्यावर मोठ्यानं ओरडणार त्याच वेळी त्याने रडत रडत आवाज दिला, ' मेलो गं मेलो, त्या पोलिसांनं लई बदडलं, काठीनं लई मारलं गं......' असे ऐकल्या बरोबर ती धन्याजवळ पळत गेली आणि त्याला सहारा देऊन घरात आणलं. खरंच त्याला खूप मार लागलं होतं. त्याने सारी कहाणी सांगितली. सायंकाळच्या वेळेला कुठं काही मिळते का म्हणून तो घराबाहेर पडला. रस्त्यात जागोजागी पोलीस गस्त घालत होते कारण ही तसेच होते ना ... कोरोना व्हायरसमुळे शहरात गेल्या पाच दिवसापासून लॉक डाऊन झालं होतं. कोणीही घराबाहेर पडू नये अशी सूचना सर्वांना देण्यात आली होती. शहरातील सर्वच दुकाने आणि कारखाने बंद करण्यात आली होती. रस्त्यावर गल्ली बोळात शुकशुकाट होता. तरी ही तो पोलिसांचे नजर चुकवून कुठं तरी काही तरी खायला मिळते का याचा शोध घेत फिरत असतांना पोलिसांच्या तावडीत सापडला. पोलिसांना त्याने आपली करूण कहाणी सांगितली पण ते ऐकायला तयार होईना. त्यातच एका पोलिसाने आपला दंडुका त्याच्यावर चालवला, लगोलग दुसऱ्या पोलिसाने ही दोन चार मार दिले. एवढंच नाही तर पोलीस स्टेशनमध्ये नेऊन बसवलं. तीन चार तासानंतर सोडून दिलं. तो तसाच लंगडत लंगडत घरी आला. तिने त्याला जरासे शेकलं आणि सर्वजण त्या रात्री तसेच झोपी गेले.

दुसऱ्या दिवसाची सकाळ कशी उजाडेल? याची कल्पना करून तिला तिला रात्रभर झोप लागली नाही. आई मला भूक लागली काही तरी खायला दे या आवाजानेच तिला जाग आली. बाबाने रात्री काही तरी आणलं असेल या आशेपायी ती मुलं आशाळभूत नजरेने पाहत होती. मात्र बाबाची परिस्थिती मुलांना काय माहित? तशी आई काहीच बोलत नव्हती. रोज मोलमजुरी करून आपलं कुटुंब चालविणारे, तिच्या घरात आज काही नव्हतं, मुलांना खाण्यास देण्यासाठी. ती मनोमनी देवाची प्रार्थना करत होती. देवा, यापेक्षा आम्हांला तू बोलावून घे, या कोरोनापेक्षा आम्हांला भुकेचा आजार खूप मोठा आहे. देवा, सोडवं रे या काळजीतून.....! फक्त देवाच्या धावा करण्यापलीकडे तिच्या हातात काहीच नव्हतं. तिचा धनी निदान चार दिवस तरी उठू शकणार नाही अशी त्याची स्थिती झाली होती. ती जिथे काम करायला जाते, तो कारखाना गेले पाच दिवस झाले बंद होते त्यामुळे ती तेथे काम करायला जाऊ शकत नव्हती. मुलांच्या शाळा बंद होत्या त्यामुळे त्यांचे शाळेतील एकवेळाचे जेवण बंद झाले होते. काय करावे तिला काही एक सुचत नव्हते. मुलं भुकेने धाय मोकलून रडत होते. तेवढ्यात दारावर कोणी तरी दस्तक दिलं. गळलेलं अवसान एकत्र करून ती दारावर गेली पाहते तर काय ....? कारखान्याचा मालक उभा होता. त्याच्या सोबत चार-पाच माणसं

देखील होती. सर्वांच्या हातात भरलेल्या पिशव्या होत्या. मालकाने एकाला पुढे बोलावलं आणि तिच्या हातात पिशवी द्यायला सांगितलं. तिने पिशवी हातात घेतली आणि त्यात पाहिलं तेंव्हा तिच्या डोळ्यातून अश्रू वाहू लागले. पिशवी मध्ये आठवडाभर पुरेल एवढं धान्य त्यात होतं. मालकांनी तिला धीर दिलं आणि म्हणाला, ' घाबरू नका, लॉकडाऊन संपेपर्यंत तुमच्या घराची काळजी मी घेईन ' हे मालकांचे बोलणे ऐकून ती त्यांच्या पायावर पडली. मालकांचे आणि देवाचे मनोमन आभार मानले.

# ४) निरागस नामा

हरिपूर नावाच्या गावात राधा आणि किशन मोलमजुरी करून आपले जीवन जगत होते. त्यांच्या परिवारात आजपर्यंत मुलगी जन्माला आलीच नाही. यांनी देखील मुलगी व्हावी म्हणून सहा मुलांना जन्म दिले. राधा सातव्यांदा गरोदर होती, किशनला खात्री होती की यावेळी नक्की मुलगी होईल. पण हाय रे देवा, यावेळी देखील मुलानेच जन्म घेतला. सातवा पुत्र ज्या दिवशी जन्मला तो वार शनिवार होता. घरातले सर्वचजण मुलगा जन्मला म्हटल्याबरोबर नाक मुरडले, आणि त्या मुलाचा तिरस्कार करू लागले. त्याच्या जन्मसोबत अनेक प्रश्न देखील जन्मास आले. मुलगी होण्याऐवजी मुलगा का जन्माला आला? असे प्रश्न त्याच्या आईला आणि त्याला रोज विचारले जात. त्यामुळे ते दोघे खूपच कंटाळले होते. त्याचे नाव नामदेव असे जरी असले तरी घरातले सारेचजण त्याला शनी म्हणूनच बोलावत होते. तो घरात कोणाचाच आवडता नव्हता, दिसायला सुंदर ही नव्हता त्यामुळे सर्वचजण त्याचे तिरस्कार करायचे. तो एकटाच खेळायचा, एकटाच फिरायचा आणि एकटाच रडत बसायचा. कोणताच भाऊ त्याला जवळ घेत नव्हते, तेच जर बहीण राहिली असती तर

सारेचजण खूप प्रेम केले असते, जीव लावला असता असे अनेकांचे बोल तो ऐकत असे. यात माझा काय दोष? म्हणत तो रडत बसायचा. त्यांच्या आळीतला शिवा नावाचा एक त्याच्याच वयाचा मुलगा मित्र बनला होता. शिवाला सुद्धा घरात अशीच वागणूक मिळत होती, त्यामुळे तो देखील नेहमी दुःखी राहायचा पण नामा आणि शिवा यांची मैत्री झाली तसे दोघेजण खूप वेळ एकत्र राहू लागले, खेळू लागले, एवढेच नाही तर दंगामस्ती देखील करू लागले. कोणाचे वस्तू पळावयाचे, लपवून ठेवायचे असे नाना प्रकारचे कृत्य करून सर्वांना या दोघांनी भंडावून सोडले होते. दोघांमध्ये एक गोष्ट समान होती, ती म्हणजे, कोणी ही कोणतेही काम सांगो ते पूर्ण करायचे. या एका बाबीमुळेच कोणीही त्यांना काही बोलत नसे.

नामा आणि शिवा आता मोठे झाले होते. आळीच्या बाजूला असलेल्या सरकारी शाळेत ते दोघे शिकायला जाऊ लागले. तिथे ही त्यांची दंगामस्ती काही कमी झाली नाही. शाळेतल्या पोरांसोबत गुरुजींना देखील या दोघे त्रास देत होते. पाचवी पास होऊन ते दुसऱ्या गल्लीच्या खाजगी शाळेत गेले. तिथे खूप कडक शिस्त होती. तिथे मात्र यांना काहीच करता येत नव्हते. त्या शाळेत देखील नामाने एक कारनामा केला ज्यामुळे तो सगळ्या शाळेत ओळखला जाऊ लागला. त्याचे एका मॅडमने त्याला एक काम सांगते.

ऑफिसमध्ये अलमारी आहे, तिथे माझ्या नावाचा एक कप्पा आहे, त्यांच्यामध्ये एक पुस्तक ठेवलेलं आहे, ते घेऊन ये. नामा ऑफिसमध्ये जातो, आलमारीवर नाव शोधतो, हेच आहे कप्पा समजून तो चुकून दुसऱ्या शिक्षकांचा कप्पा उघडतो. पुस्तकांचा शोध घेतो तेंव्हा चार पाच रजिस्टरखाली एक रंगबिरंगी पुस्तक दिसते. हेच पुस्तक असावं म्हणून तो पुस्तक घेऊन बाहेर पडतो. काही अंतर चालून जातो न जातो शाळेचे मुख्याध्यापक समोरून येतात आणि त्याला अडवतात.

" नामा तुझ्या हातात काय आहे? "

" सर पुस्तक आहे, मॅडमनी आणायला सांगितलं"

" बघू कोणतं पुस्तक आहे?"

मुख्याध्यापक पुस्तक पाहून चक्रावून जातात.

" कोण सांगितलंय तुला हे पुस्तक आणायला?"

"आमच्या मॅडमनी सांगितलं "

त्याला काही कळले नाही पण ते रंगबिरंगी पुस्तक पाहून मुख्याध्यापक खूपच रागात आले आणि म्हणाले, " मॅडमला, ऑफिसमध्ये बोलवलं म्हणून सांग "

नामा वर्गात जातो. " नामा पुस्तक कोठे आहे?"

" मॅडम, मुख्याध्यापक सरांनी ते पुस्तक घेतलंय आणि तुम्हांला ऑफिसमध्ये बोलावलं" असे सांगतो. मॅडमला प्रश्न पडतो की, मुख्याध्यापक मला कशाला बोलवले असेल? तर मुख्याध्यापकांना प्रश्न पडतो की, मॅडमला या पुस्तकाबद्दल कसं बोलावं? मॅडम ऑफिसमध्ये येतात, " सर, कसे काय बोलावलंय? " सरांनी मॅडमकडे हातातील रंगीबेरंगी पुस्तक दाखवत, " मॅडम, असे पुस्तक वाचताय तुम्ही" मॅडम ते रंगीबेरंगी पुस्तक पाहून क्रोधीत होतात आणि म्हणतात, " हे पुस्तक माझं नाही, कोणी दिलाय तुम्हांला?"

" आता नामा हे पुस्तक घेऊन तुमच्याकडे येत होता, तुम्ही आणायला सांगितलं असे तो म्हणाला"

" सर, हे माझे पुस्तक नाही." मॅडम आपल्या कप्प्याकडे जाते आणि त्यातून गोष्टीचे पुस्तक काढते " हे पुस्तक आणायला सांगितलं होतं, त्याने कोठून आणलं मला माहित नाही."

" ठीक आहे, तुम्ही वर्गात जा आणि नामाला पाठवा"

मॅडम वर्गात जाते आणि नामाला ऑफिसमध्ये पाठविते. " पुस्तक कुठून काढलं?" मुख्याध्यापक त्याला विचारतात. तेंव्हा तो आलमरीच्या एका कप्प्याकडे बोट दाखवितो, जे की मॅडमच्या बाजूला दुसऱ्याच शिक्षकांचे असते. त्याला वर्गात जाण्याची सूचना

देतात. त्या शिक्षकांला ऑफिसमध्ये बोलावून त्याची कान उघाडणी करतात. हे नामामुळे उघड झालंय हे ही सांगायला विसरत नाहीत. त्यामुळे नामा संपूर्ण शाळेत प्रसिद्ध झाला होता. मात्र त्या गुरुजींची गोची झाली होती. असा हा नामा लहानाचा मोठा होऊ लागला. दहावी पर्यंतचे शिक्षण हसत खेळत मजेत पूर्ण झाले होते. अडल्या नाडल्या सर्वांना तो कामाला पडत असे त्यामुळे लोकांनी त्यांचे नाव सरपंच असे ठेवून टाकले. सरपंच म्हणून हाक मारताच नामाची छाती फुलून जायची आणि अवघड - सोपी सारीच कामे पूर्ण करायचा. असेच एकदा गावातील

किसन नावाचा माणूस त्याच्या हातात एक पिशवी देतो, ज्यात शृंगारिक साहित्य असते. " सरपंच, इकडे या जरा, हे पिशवी आमच्या दुसऱ्या घरी देऊन ये" किसनला लग्नाची एक आणि बिन लग्नाची एक असे दोन बायका होत्या. नामा पिशवी घेतला आणि लग्नाच्या बायकोला दिला. " मालकाने दिलंय " असे म्हणून तो निघाला. किसन इकडे पत्याच्या डावात रंगून गेला होता. दुसऱ्या बायकोला एका कार्यक्रमाला जायचे होते म्हणून ती सामानाची वाट पाहत होती. ती फोनवर फोन करून त्याला तंग करत होती. " नामाला पाठविलोय येईल थोड्याच वेळात, पुन्हा फोन नको करुस " अशी तंबी दिली. पत्याच्या मोठा डाव चालू होता, एक पत्ता आला तर किसन दहा हजार जिंकणार होता, तेवढ्यात मोबाईलची

घंटी वाजली, पुढच्याने डाव जिंकली, तसे किसन रागाने लालेलाल झाला. रागात फोन उचलला, " मर तिकडं, फोन करू नको म्हणून सांगताना फोन केलीस, गेले सारे पैसे ...!" लगेच फोन बंद ही केला. किसनच्या या वागण्याचा तिला खूपच राग आला. ती कार्यक्रमाला गेलीच नाही. सायंकाळी किसन तिच्या घरी गेला. ती खूपच रागात होती. सामान मिळालेच नाही हे त्याला कळल्यावर अजून राग आला. तेथून सरळ घरी आला. घरी बायको आज खूपच आनंदात होती. कधी नव्हे ते, एवढं सामान तिला पाहायला मिळालं. तिने खूप वेळ विचारलं त्याला पण त्याने काही एक सांगितलं नाही. तेंव्हा तिला पक्का विश्वास बसला. आजपर्यंत तिला सत्य वाटत नव्हतं, मात्र आज सत्य पटलं होतं. रागारागाने ती आपल्या घरात गेली आणि आतून कडी लावून घेतली. किसन मात्र आपल्या कपाळावर हात मारून बसला होता. नामामुळे आज किसनचा भंडाफोड झाला होता.

असा हा नामा दुसऱ्याला मदत तर करत असे मात्र त्याच्या मदतीमुळे एक नवा प्रश्न निर्माण होत असे.

# 05) लालच बुरी बला है ।

"हॅलो, मी अमुक कंपनी मधून बोलतोय, आपला मोबाईल क्रमांक लकी विनर ठरला असून आपणांस 10 लाख रुपयांची लॉटरी लागली आहे. अभिनंदन "

रमेशला एकाने फोनवर ही माहिती दिली. लगेच फोन कट देखील झाला. रमेशला या गोष्टीचा खूपच आनंद झाला. मनातल्या मनात तो जोरजोरात उड्या मारू लागला. काही मिनिटांनी त्याच्या मोबाईलवर मेसेज आलं होतं, ज्यात लिहिलं होतं की, त्याचा मोबाईल क्रमांकावर दहा लाख रुपयांचे बक्षीस मिळाले असून ही रक्कम मिळविण्यासाठी काही अटी टाकण्यात आले होते. ज्यात प्रमुख अट म्हणजे, दहा लाख रुपयांचे जे काही आयकर म्हणजे इन्कम टॅक्स आहे ते जवळपास पन्नास हजार रुपये अगोदर भरावे लागणार होते त्याशिवाय ही रक्कम त्याला परत मिळणार नव्हते. रमेश तो मेसेज वाचून खूप आनंदित झाला. दहा लाख रुपये मिळत आहेत तर पन्नास हजार भरायला काही हरकत नाही. या पैशातून एक छानशी टू व्हीलर घेऊ, मुलाला एक सायकल घेऊन देऊ आणि बायकोला मस्त एक - दोन तोळयांचे दागिने करू असा विचार करत त्याचा तो दिवस खूपच मजेत आणि आनंदात गेला.

रमेश चांगला शिकलेला आणि होतकरू शेतकरी होता. तालुक्यापासून पाच सहा किमी अंतरावरील राजेवाडी ह्या गावात तो आपल्या कुटुंबासह राहत होता. त्याच्या घरात फक्त चारच जण होते, त्याची बायको, मुलगा, आई आणि तो स्वतः असे चार ही जण सुखात जीवन जगत होते. त्यांना कोणत्याच गोष्टीची कमतरता नव्हती. शेती बऱ्यापैकी म्हणजे दहा एकर होती तर तीन एकरमध्ये पाणी देऊन भाजीपाला वगैरे उत्पन्न घेतल्या जात होते. त्यामुळे रमेशच्या घरात नेहमीच पैसा खेळत होता. रमेशला कोणत्याच गोष्टीची सवय नव्हती. तो बाहेर साधा चहा देखील पीत नसे. दारू, सिगारेट, तंबाखू, पत्ते खेळणे असे कोणतेच वाईट सवय त्याला नव्हते म्हणूनच काय त्याचे एक मित्र नव्हता व गावातील सर्व लोक त्याला कंजूष म्हणत असे. पण तो लोकांच्या बोलण्याकडे अजिबात लक्ष देत नसे. आपले काम भले आणि आपण भले असे त्याला वाटायचे. तरी ही रमेश पैश्याच्या बाबतीत खूपच भूकेला असायचा. पैसा कसा कमवायचा याचं तंत्र त्याला चांगलं माहीत होतं. त्यांच्या बँकेच्या खात्यात लाख-दोन लाख नेहमीच पडून असायचे. त्यामुळे त्याला कशाची काळजी वा चिंता मुळीच नव्हती. रमेशने नुकतेच दहा हजार रुपयांचे स्मार्ट फोन विकत घेतले होते. काही दिवसांनीच त्याला लॉटरी लागल्याची बातमी कानावर आली. दुसऱ्या दिवशी सकाळी सकाळी परत एक मेसेज आलं की,

आजच्या आज पन्नास हजार रुपये भरले तरच आपणाला दहा लाख रुपये मिळतील अन्यथा आपणास हे पैसे मिळणार नाहीत. हा मेसेज वाचून रमेश विचार करू लागला. काय करावं? पैसे भरावं की भरू नये? कुणाला याबाबत सल्ला विचारावं म्हटलं तर गावात कोणीच मित्र नाही. अखेर मनाशी पक्का विचार केला आणि उठून तोंडहातपाय धुतला. अंघोळ केला आणि बँकेत जाण्यासाठी घराबाहेर पडला. आपल्या खात्यामधून त्याने मेसेजमध्ये दिलेल्या खात्यावर पन्नास हजार रुपये भरला आणि दहा लाखाचे स्वप्न घेऊन घरी परत आला. बरोबर दुसऱ्या दिवशी सकाळी सकाळी त्याचा फोन खणखणाला. तिकडून बोलणाऱ्याने भरलेले पैसे मिळाल्याचे सांगितले तसेच खात्यामध्ये रक्कम भरण्यासाठी रमेशच्या बँकेची माहिती त्वरित पाठविण्यास सांगितले. म्हणजे आजच्या आज त्यांच्या खात्यात ती रक्कम भरली जाईल. पैसे मिळाले असल्याचे फोन आल्यामुळे रमेशला खात्री पटली आणि त्याने क्षणाचाही विचार न करता बँक डिटेल्स पाठविला. त्याचे मन कुठे ही लागत नव्हते. कधी एकदा दहा लाख रुपये मिळतील असे त्याला वाटत होते. तास-दोन तासांनी परत त्या व्यक्तीने फोन केला, बँकेचे डिटेल्स मिळाले आहेत. पण या खात्यात काही तरी समस्या येत आहे ते सोडविण्यासाठी आपल्या मोबाईलवर एक ओटीपी येईल ते आम्हांला लगेच सांगा म्हणजे आम्हांला तुमच्या

खात्यावर पैसे भरता येतील. रमेशने त्याला होकार दिला. पाच-एक मिनिटाने रमेशच्या मोबाईलवर ओटीपी आले आणि लगेच त्याचा फोन देखील आला. रमेशने मागेपुढे कसलाही विचार न करता त्या व्यक्तीला ती ओटीपी सांगून टाकला. काही वेळात आपणांस दहा लाख रुपये मिळतील असे स्वप्न तो पाहू लागला. परत थोड्या वेळात त्याच्या मोबाईलवर एक मेसेज आला. खूपच उत्सुकतेने त्याने तो मेसेज उघडला. ते मेसेज वाचल्याबरोबर त्याचे डोळे पांढरे पडले होते. तोंडातून एकही शब्द बाहेर पडत नव्हता. डोके चक्रावून गेले होते. त्याच्या खात्यात दहा लाख रु. जमा होण्याऐवजी खात्यात असलेले एक लाख एकवीस हजार रु. काढण्यात आले होते. त्याने लगेच त्या व्यक्तीच्या मोबाईलवर फोन लावला तर " तुम्ही डायल केलेला नंबर सध्या बंद आहे " असे म्हणत होता. किती तरी वेळा त्याने प्रयत्न केला पण फोन काही लागत नव्हता. आपण या व्यवहारात पूर्णपणे फसलो आहोत याची जाणीव झाली होती. हाय रे देवा पाऊणे दोन लाख रुपयांचा चुना लागला असे मनातल्या मनात रडत होता. ही गोष्ट कोणाला सांगावी? काय करावं? त्याला काहीच सुचत नव्हतं. जेवणावर देखील त्याचे लक्ष नव्हते. बायकोने काय झालं म्हणून विचारलं पण तिला काही खरं बोलत नव्हता. काही नाही असे म्हणून वेळ काढत होता. त्यादिवशी खूप विचार केल्यावर पोलीस स्टेशनमध्ये जाऊन तक्रार

करण्याचे पक्के केले. सकाळी लवकर उठला, परत एकदा त्या क्रमांकावर फोन लावून पाहिला, परत तेच उत्तर येत होतं. लगबगीने शहरात जाण्यासाठी निघाला, रस्त्यात अनेक जण त्याला बोलत होते मात्र त्याचे कोठेही लक्ष नव्हते. कधी एकदा पोलीस स्टेशनमध्ये जातो आणि त्या भामट्याला पकडून आत करतो असे त्याला झाले होते. काही वेळानंतर तो पोलीस स्टेशनमध्ये दाखल झाला, त्याच्या सोबत घडलेली करुण कहाणी सांगितली. पोलिसाने सर्व कहाणी ऐकली आणि या रमेशलाच शिव्याशाप देऊ लागले. तुम्ही मूर्ख आहात, तुम्हाला एवढं कळत नाही, तुम्ही तर चांगले सुशिक्षित दिसत आहात, असे कसे काम केलात? हे सर्व ऐकून त्याचा पारा अजून चढत होता. त्या व्यक्तीचा मोबाईल नंबर आणि बँकेचा नंबर पोलिसांना देण्यात आले. पोलिसाने त्याची इंटरनेटच्या मदतीने माहिती काढली असता तो मोबाईल आणि बँकेची माहिती विदेशातली निघाली. हे काम खूपच अवघड आहे आणि त्यासाठी तुम्हांला काही पैसे खर्च करावे लागेल. पोलिसाने हे काम करायला पैशाची मागणी केली तेंव्हा त्याला आश्चर्य वाटले. पण नाईलाज झाला होता. रमेशने तसे पैसे देण्याचे मान्य केले. महिना उलटला, दोन महिने उलटले पण त्या व्यक्तीचा काही पत्ता लागत नव्हता. प्रत्येक फेरीला रमेशला शे पाचशे रुपये खर्च येत होता. या साऱ्या बाबीला तो पूर्णपणे कंटाळला होता. आपण

फुकटचे दहा लाख रुपये मिळतील अशी लालसा ठेवली ती एकदम चूक आहे. कष्टाने मिळालेलं पैसेच मनाला समाधान देऊ शकतात याची जाणीव झाली. " लालच बुरी बला है । " असे म्हणत तो पोलीस स्टेशनमधून जो बाहेर पडला तो कधी ही पोलीस स्टेशनमध्ये गेला नाही.

# 6) कृतार्थ जीवन

मोरे सर नेहमीप्रमाणे आपल्या शाळेत जात होते, तेंव्हा रस्त्याने जाणारी एक मुलगी सरांच्या पाया पडण्यासाठी वाकली होती. तिला उठवत सरांनी तिच्या चेहऱ्याकडे पाहिलं आणि लागलीच ओळखलं तिला, " मीरा आहेस ना तू ....!"

" होय सर, मी मीराच आहे "

" काय करतेस सध्या, कुठे आहेस, शिक्षण चालू आहे की बंद केलीस?"

" सर, आपल्या आशीर्वादाने आणि मार्गदर्शनाने मी पोलीस झाले. सध्या पुण्याला आहे आणि शिक्षण देखील चालू आहे " तिचे हे बोलणे ऐकून मोरे सरांना खूप आनंद झाला. पण नऊ-दहा वर्षापूर्वीचे चित्र आठवलं की सरांच्या अंगावर अजूनही शहारेच येतात.

मोरे सर आठव्या वर्गाचे वर्गशिक्षक होते. त्यांच्या वर्गात मीरा नावाची मुलगी होती. जी की अभ्यासात थोडी फार हुशार होती मात्र धावण्यात ती फारच चपळ होती. हरणाच्या वेगात ती पळत असे. तिला पळताना पाहून मोरे सर अनेक स्वप्न पाहायचे. ही मुलगी आपल्या शाळेचे नाव, आईबाबाचे नाव नक्की उज्ज्वल

करेल. मीरामध्ये काहीतरी भविष्य दिसत होतं. म्हणून मोरे सर रोज मीराची विशेष काळजी आणि विचारपूस करत असत. ती एक दिवस जरी शाळेत आली नाही तरी मोरे सरांना अस्वस्थ वाटायला लागायचे. शाळेत सर्वांनाच माहीत होतं की, खेळाचे शिक्षक मोरे सरांची आवडती विद्यार्थिनी म्हणजे मीरा. तालुकास्तर, जिल्हास्तर, विभागस्तरापर्यंतच्या धावण्याच्या स्पर्धेत मीराने यश मिळविले होते. ती त्या शाळेतली पी टी उषा होती. शाळा सुरू होऊन दोन महिन्याचा काळ उलटला होता. स्वातंत्र्य दिनानंतर मीरा जवळपास दहा दिवस शाळेत आली नव्हती. मोरे सर तिच्या मैत्रिणीला मीरा विषयी रोज विचारपूस करत असे. उद्या येईल यापलीकडे काहीच उत्तर मिळत नव्हते. म्हणून एके दिवशी रविवारी मोरे सर थेट मीराच्या घरी गेले. मीराचे घर म्हणजे एक लहानसी झोपडी होती. घरात मीरा तिच्या आई वडील आणि दोन लहान बहिणी व लहान भाऊसोबत राहत होती. त्यांना शेती नव्हती त्यामुळे तिचे बाबा सालगडी म्हणून काम करत होते तर आई दुसऱ्यांच्या शेतात मजुरी करत होती. दोन लहान बहिणी गावातल्या शाळेत शिकत होती तर छोटा भाऊ कधी घरी तर कधी आई सोबत शेतात जात असे. मोरे सर घरी आल्याचे पाहून तिला सुरुवातीला भीती वाटली पण सरांनी घरी येण्याचे कारण सांगितल्यावर तिच्या मनातली भीती दूर झाली. मोरे सरांनी तिला व तिच्या आईबाबांना

शाळेत न येण्याचं कारण विचारलं असता कोणी ही उत्तर देत नव्हते. समस्या ही सांगत नव्हते फक्त एवढंच सांगत होते की, ती आता यापुढे मीरा शाळेत येऊ शकणार नाही. मोरे सरांनी खूप समजावून सांगितलं, " काही समस्या असेल तर मी सोडवतो, तुम्ही मीराला शाळेत पाठवा प्लिज...!" यावर तिच्या बाबानी म्हटलं, " नाही सर, काही समस्या नाही, पण मीरा शाळेत येणार नाही, घरी तिचा भाऊ एकटाच असतो, त्याला सांभाळण्यासाठी कुणी तरी घरी पाहिजे आता. " मोरे सर नाराज होऊन घरी परतले. मीराचे भवितव्य अंधारात जाईल असे वाटू लागले. मीराला शिकण्याची ईच्छा होती मात्र आई बाबा तिला शाळेत पाठवायला तयार नव्हते कारण मीरा नुकतीच उपवर झाली होती आणि यापुढे तिला शहरातल्या शाळेत पाठविणे त्यांना जिकरीचे वाटत होते. दिवाळीच्या सुट्ट्या लागल्या होत्या. या दिवसांत मीराला बघायला स्थळ येऊ लागले होते. काही दिवसांनी मोरे सरांना हे सर्व कळाले. मीरा शाळेत न येण्याचे खरे कारण देखील कळाले तेंव्हा त्यांना खूप अस्वस्थ वाटले. परत एकदा त्यांनी मीराच्या घरी गेले. यावेळी त्यांनी मीराला शाळेत पाठविण्याची विनंती केली नाही तर मीराचे एवढ्या लहान वयात लग्न करणे तिच्यासाठी धोक्याचे आहे, तसेच लहान वयात लग्न करणे कायदेशीर गुन्हा आहे त्यामुळे तिला शाळेत पाठवू नका पण तिचे लग्न करू नका." सरांचे बोलणे आई बाबांना पटले. काही

दिवसाचा कालावधी उलटला होता आणि हिवाळी क्रीडा स्पर्धेचे वेळापत्रक आले होते. मीरा शिवाय कोणतेच पदक मिळणार नाही याची खात्री होती. म्हणून मोरे सर परत एकदा मीराच्या घरी गेले. हिवाळी क्रीडा स्पर्धेत मीरा कोणत्या कोणत्या खेळात यश मिळवू शकते हे सरांनी मिराच्य बाबाला समजावून सांगितले. दहा दिवसांसाठी तिला शाळेत पाठविण्याची विनंती केली. मीराच्या बाबानी ते विनंती मान्य केली. दुसऱ्या दिवशी मीरा शाळेत आली. याच गोष्टीचा फायदा घेत मोरे सरांनी मीराला तिच्या भविष्याचे चित्र दाखविले. ही शेवटची संधी आहे, यावेळी राज्यस्तरीय मैदानी स्पर्धेचे दार ठोठावे लागेल. त्या दिशेने तुला मेहनत घ्यायचं आहे. सरांचे बोलणे तिला पटले. तालुकास्तरीय व जिल्हास्तरीय स्पर्धेत तिने अनेक स्पर्धेत यश मिळविले होते. आता विभागीय स्पर्धेसाठी तिची दोन स्पर्धेत निवड झाली. घरून परवानगी मिळते की नाही याची काळजी तिला लागली होती. पण मोरे सरांच्या शब्दांत जादू होती. त्याचीही परवानगी मिळाली. विभागीय स्पर्धेत मीराने चमकदार कामगिरी करत शंभर मीटर आणि रिले मध्ये प्रथम क्रमांक मिळवत राज्यस्तरीय स्पर्धेसाठी पात्र ठरली. अनेक वृत्तपत्रानी तिच्या कामगिरीची दखल घेत बातम्या प्रसिद्ध केल्या. काही दिवसांनी ती आपल्या गावी परत आली तेंव्हा सारा गावच नाही तर जिल्हा आणि तालुक्यावर देखील तिचा सत्कार करण्यात

आला. मीराच्या आईबाबाची छाती फुलून गेली होती. राज्यस्तरीय स्पर्धेत सहभागी होण्यासाठी आई बाबाची परवानगी घ्यायची गरजच पडली नाही कारण आपल्या मुलींमध्ये कोणते कौशल्य आहे हे त्यांना कळाले होते. राज्यस्तरीय स्पर्धा संपन्न झाली तेथे तिला तिसऱ्या क्रमांकावर समाधान राहावे लागले. मात्र प्रसिद्धी मिळाली, मोरे सर सोबत होतेच. तिची आठवीचे वर्ष असेच संपले. परीक्षेत पास व्हावे म्हणून तिला परीक्षा देण्यास आई बाबानी तयारी दर्शविली. त्यांचा मनोदय देखील बदलला. मीराला पुढील शिक्षण देण्याची आई बाबानी होकार दिला तर मोरे सरांनी दहावी पर्यंतचे शिक्षणाचा खर्च उचलण्याची तयारी दाखविली. मीरा रोज शाळेत येत होती आणि अभ्यासासोबत विविध खेळात ती चमकत देखील होती. चांगल्या गुणाने ती उत्तीर्ण झाली. त्यानंतर ती पुढील शिक्षणासाठी जिल्ह्याला गेली. ती शिक्षण घेत होती एवढीच माहिती सरांना होती. पण अचानक रस्त्यात आज मीराची भेट झाली आणि पुन्हा एकदा भूतकाळ आठवून गेला. ती पोलीस कशी झाली हे सांगताना ती म्हणाली, " दहावीनंतर जिल्ह्याच्या ठिकाणी गेले. तेथे आपल्यासारखेच भोसले सर मिळाले ज्यांनी माझी सर्व व्यवस्था केली होती. तसेच खेळाच्या स्पर्धेत अनेक पदक मिळविले.याच बळावर बारावी व पदवी झाल्यानंतर पोलीस भरतीमध्ये अर्ज केला. लेखी परीक्षेत पास झाले आणि मैदानी

स्पर्धेत सहज उत्तीर्ण झाले. मग काय पुण्याला पोलीस म्हणून नोकरी मिळाली. आई बाबा दोन बहिणी आणि भाऊ आम्ही सर्वजण एकत्र आता पुण्याला राहतो" हे सारे तिचे बोलणे ऐकून मोरे सरांना जीवन कृतार्थ झाल्यासारखे वाटले.

# 07) संशय

अमेयच्या मनातील संशयाने सृष्टीचा अंत झाला. त्याच्या मनातील संशय दूर करण्यात सृष्टी असफल ठरली आणि अमेयने रात्रीच्या गाढ झोपेत सृष्टीचा गळा आवळून खून केला. तिच्या मृत्यूची बातमी त्याने स्वतःच पोलिसांना दिली आणि झोपेच्या जास्त गोळया खाल्याने तिचा मृत्यू झाला असावा असे पोलिसांना सांगितले. पण पोलीस सर्व घटनेचा आढावा घेतला आणि काही क्षणात अमेयला हातकडी टाकून तुरुंगात टाकण्यात आले. तुरुंगाची हवा खाल्यावर अमेयला आपल्या केलेल्या कर्मविषयी पश्चाताप वाटू लागला. पण वेळ पुरती संपून गेली होती. आता ती वेळ पुन्हा परत थोडीच येणार होती.  त्याच्या डोळयासमोरून तो वीस वर्षांपूर्वीचा काळ एखाद्या चित्रपटाप्रमाणे सरकू लागला.

अमेय एक हुशार आणि दिसायला देखणा मुलगा होता. बारावीला चांगले गुण मिळाले म्हणून तो मेडिकल आणि इंजिनिअरिंग करण्यापेक्षा डी. एड. करण्याकडे आपले लक्ष दिल. त्याचाच कॉलेज मध्ये सृष्टी देखील होती जी की सुंदर तर होतीच शिवाय बोलकी आणि मनमिळाऊ देखील होती. कॉलेजमधल्या सर्वांशी ती प्रेमाने वागायची. तिच्या मनात किंतु परंतु असा

कुठलाच भाव नव्हता. तशी ती अमेयला देखील बोलायची. अमेय मात्र सर्व मुला-मुलीपासून दूर राहायचा. आपला अभ्यास आणि घर याशिवाय त्याला दुसऱ्या कोणत्याच गोष्टीशी देणे घेणे नसायचे. त्याच्या या गुणांवर फिदा होऊन सृष्टी ने स्वतः अमेयला मागणी घातली. सुरुवातीला अमेय जरासा घाबरला पण वेळ मारून नेत नंतर सांगतो असे म्हणाला. वास्तविक पाहता त्याला देखील सृष्टी आवडत होती मात्र लग्न करण्यासाठी जात आडवी येत होती. दोघेही भिन्न जातीचे होते. सृष्टी मागासवर्गीय होती आणि अमेय उच्च वर्गीय होता. त्याचे डोके विचार करून सुन्न पडत होते. त्यात डी. एड चे दोन वर्षे पाहता पाहता संपले. दोघांची ताटातूट झाली. मात्र मोबाईल नामक विशेष दूताने त्यांचा संपर्क टिकवून ठेवला. एक एक दिवस काळजीत संपून जात होता. शिक्षक भरतीची जाहिरात आली. दोघांनी पण अर्ज केला. अमेयने नोकरी लागल्यानंतर लग्नाचा विचार करू असा निर्णय दिल्यामुळे दोघेही नोकरीसाठी प्रतीक्षा करू लागले. परीक्षा झाली आणि काही दिवसांनी निकाल घोषित झाला. अमेय एवढा हुशार असून देखील त्याची निवड झाली नव्हती आणि इकडे सृष्टीची मात्र जिल्हा परिषदेत शिक्षिका म्हणून निवड झाली होती. सृष्टी खूप खुश होती. तिला सरकारी निकरी मिळाली याचा खूप आनंद वाटत होता. तर त्याच वेळी अमेयला नोकरी न मिळाल्याचे दुःख ही वाटत होतं.

सृष्टी आता रोज शाळेला जाऊ लागली. येता जाता अमेयची रोज भेट व्हायची. खूप गप्पा गोष्टी व्हायच्या मात्र अमेय मनातून आनंदी नव्हता, हे सृष्टी देखील जाणून होती. असेच दोन वर्षे निघून गेली. शासन काही शिक्षकांची भरती करत नव्हते. अमेय रोज जाहिरातीची वाट पाहायचा. एके दिवशी संस्थेतल्या जागेसाठी अमेय गेला. त्यांच्या वडिलांच्या ओळखीने त्याला त्या शाळेत जागा मिळाली. पण पगार खूपच कमी होता. शाळेत प्रचंड हुशार असलेला अमेय या जंजाळात पार होरपळून गेला होता. अमेयला नोकरी मिळाल्याचा सृष्टीला अत्यंत आनंद झाला. मागे ठरल्याप्रमाणे नोकरी मिळाल्यावर लग्न करू या वचनाची सृष्टीने अमेयला आठवण करून दिली. हो नाही म्हणत त्यांचे दोघांचे लग्न अगदी धुमधडाक्यात झाले. लग्नाला डी. एड. ची सर्वच मित्रमंडळी आली होती. अमेयचे मित्र आणि सृष्टीच्या मैत्रिणी यांनी लग्नात खूप धमाल केली. त्यात राजेश नावाचा मित्र जो की अमेयचा मित्र होता तो त्या लग्नाच्या दिवशी जरा जास्तच दारू ढोसली होती आणि काही ही बकायला सुरू केली. सृष्टी बद्दल तो दोन चार वाक्ये बोलून गेला जे की अमेयला माहीत नव्हते. तसं सृष्टी सर्वांसोबत हसत खेळत आणि प्रेमाने वागत होती. तिच्या ध्यानीमनी नसलेल्या गोष्टी राजेशने बेधुंद नशेत बोलून गेला. झाले संसाराची सुरुवातच संशयाने झाली. पहिल्या रात्रीच या विषयावर दोघांचे खूप बोलणे

झाले. सृष्टीने सर्व काही सत्य उलगडून सांगितले आणि तुझ्याशिवाय मी कोणावर ही प्रेम केलं नाही असे तिने डोके बडवून सांगितले. पण अमेयच्या डोक्यातून राजेशने त्यादिवशी बोललेले वाक्य डोक्यातून काढायला तयार नव्हता. राग, प्रेम, लोभ, वाद-विवाद, भांडण, तंटा करत आयुष्य पुढे जात होतं. याच काळात त्यांच्या संसारवेलीवर दोन फुले देखील उमलली. सृष्टीला शाळेतून यायला उशीर झाला की, अमेयची प्रश्नांची सरबत्ती सुरू व्हायची. कोणी शिक्षक सृष्टीला बोलत आहे असे दिसले की, कोण होता तो? याची चौकशी सुरू व्हायची. मोबाईलवर शाळेच्या मुख्याध्यापक किंवा केंद्रप्रमुखाशी बोलले तरी प्रश्न तयारच. अमेयच्या या संशयी वृत्तीचा तिला खूप कंटाळा आला होता. ती अधून मधून स्वतःच पश्चाताप करून घ्यायची की, माझी निवड चुकली का म्हणून..!. असेच एके दिवशी शनिवारी शाळेतून घरी यायला तब्बल तीन तास उशीर झाला होता. अमेयने फोन करून पाहिला तर फोन बंद येत होता. त्याच्या मनात संशयाची सुई गरगर फिरत होती. तब्बल चार तासानंतर पाच वाजता घरी आली. अमेयने तिला घरात ही घेतले नाही की, प्रश्न सुरू,  का उशीर झाला? यावर सृष्टी म्हणाली, घरात चला सर्व सविस्तर सांगते. पण अमेय ऐकायला तयार नाही. इथेच सांग म्हणून अडून बसला. तिला शेवटी नाईलाज होता म्हणून ती उशीर का झाला याचे उत्तर

सांगायला सुरुवात केली. शाळा सुटणार म्हणताना आमचे साहेब शाळेत आलेत. त्यांनी शाळेतल्या सर्व बाबींची तपासणी केली. त्यांनी शाळेत आल्याबरोबर आम्हांला मोबाईल बंद करायच्या सूचना दिल्या त्यामुळे मोबाईल बंद करावा लागलं. साहेबांनी सुमारे तीन तास आमच्या शाळेची तपासणी केली. त्यामुळे घरी यायला उशीर झाला. या उत्तराने अमेय समाधानी झाला नाही. त्याने मुख्याध्यापकाला फोन लावून विचारणा केली. जेव्हा मुख्याध्यापकाकडून दुजोरा मिळाला तेंव्हा घरात प्रवेश मिळाला. सध्या साध्या बाबीवर त्याचा संशय बळावत चालला होता. अमेयचे शाळेत देखील मन लागत नव्हते करण त्याच्या मनासारखी शाळा त्याला मिळाली नव्हती. सर्वच बाबतीत अपयश मिळत राहिल्याने तो हळू हळू दारूच्या आहारी गेला. सुरुवातीला फक्त रात्री पिउन येणारा अमेय आता सकाळी उठल्यापासून दारू ढोसू लागला. सृष्टीने खूप समजावून सांगण्याचा प्रयत्न केला पण त्याचा काही फायदा झाला नाही. त्यादिवशी देखील तो खूप दारू पिऊन आला होता. लेकरं आपल्या खोलीत झोपली होती. थोडं देखील होश नसलेला अमेय सृष्टीच्या खोलीत आला आणि तिला शिव्या द्यायला सुरुवात केली. सृष्टीने त्याला खूप समजावून सांगत गप्प गुमान झोपण्याची तंबी दिली. एवढ्यावरच त्याचा राग अनावर झाला आणि त्याने सृष्टीचा गळा गच्च आवळून धरला. काही

मिनिटाच्या झटापटीत सृष्टी गप्पगार झाली. अमेयला त्यावेळी काही सुधरत नव्हते. त्याच नशेत पोलीस स्टेशनला फोन लावून सृष्टी मेल्याची बातमी दिली. झोपेच्या गोळ्या खाऊन मेली असा बयाण त्याने दिला मात्र पोस्टमार्टेम रिपोर्ट काही औरच सांगत होते. पोलिसांनी संशयाच्या बळावर अमेयला अटक केले. तुरुंगात चोवीस तास देखील राहिला नाही की, पोपटासारखं सर्व कहाणी पोलिसांना सांगितली. संशय ही माणसाला लागलेली फार मोठी समस्या आहे. संशयी माणूस कधी ही सुखी, समाधानी राहू शकत नाही आणि इतरांना राहू देत नाही. म्हणून संशयापासून दूर राहणे कधी ही चांगले.

# 08) गोट्या

आज दूरदर्शनवरील पुनः प्रक्षेपित होत असलेले रामायण मालिका पाहतांना गोट्याला म्हणजे सोहमला त्याचे 20-25 वर्षापूर्वीचे बालपण आठवून गेले. कोरोना विषाणूमुळे संपूर्ण भारतात लॉकडाऊन झाले होते. कोणीही घराबाहेर पडू नये, घरातच राहावे म्हणून सरकारने सक्तीचे आदेश काढले. घरात बसून बसून लोकांना कंटाळा येऊ नये म्हणून सरकारने पुनश्च एकदा जुनी मालिका रामायण दाखविण्यास प्रारंभ केले होते. आज ती रामायण मालिका पाहतांना गोट्याला ती मजा येत नव्हती, जी मजा त्याने लहानपणी अनुभवली. तो आपल्या भूतकाळात रमला.

खरं तर त्याचे नाव सोहम होते पण घरात, दारात, गल्लीत सर्वत्र तो गोट्या या नावानेच प्रसिद्ध होता. त्याला ही कारण ही तसेच होते. सोहम अगदी लहान म्हणजे शाळेत जाण्याचे वय नसल्यापासून गोट्या खेळायचा. गोट्या असा खेळायचा की त्यात त्याचा विजय ठरलेला असायचा. त्याच्या खिशात नेहमी गोट्या असायच्या म्हणूनच त्याचं नाव गोट्या पडलं होतं. खूप वेळा त्यासाठी त्याला आई-बाबांच्या शिव्या देखील खाव्या लागल्या. त्याचे वडील एका सरकारी शाळेत शिक्षक होते, त्यांची आणि

गोट्याची भेट रविवार ते रविवारीच व्हायची. आई घरकाम आणि शेतीकम करायची. गोट्यापेक्षा एक मोठी बहीण होती. असे इनमिन हम दो हमारे दो असा त्यांचा परिवार होता. गोट्या घरात लहान असल्यामुळे सर्वजण त्याच्यावर जीवापाड प्रेम करायचे आणि तो देखील रडून रडून आपला हट्ट पूर्ण करून घ्यायचा. गोट्याचे शाळेत जाण्याचे वय झाले होते मात्र तो काही शाळेत जाण्यास तयार होत नव्हता. त्याची मोठी बहीण चौथ्या वर्गात शिकत होती. शेवटी एके दिवशी तिने गोट्याला घेऊन शाळेत गेली आणि त्याचा शाळेचा प्रवास सुरु झाला. सर्वात आनंदाची गोष्ट म्हणजे गल्लीमधले पाच सहा मुलं त्याच्या वर्गात त्याला दिसली त्यामुळे अजून आनंद वाटला. ते सर्वच मित्र मिळून शाळेत अनेक खेळ खेळू लागले, सोबत गोट्याचा खेळ देखील होताच. शाळेतून घरी आलं की दप्तर फेकून द्यायचं आणि खेळायला बाहेर जायचं हा त्याचा रोजचा दिनक्रम असे. दिवेलावणीच्या वेळी घरी यायचे, हातपाय धुयायचे, शुभम करोती म्हणायचं आणि जेवण करून झोपी जायचं. सकाळी उठलं की परत थोडा वेळ खेळायचं आणि स्नान करून शाळेला जायचं, या रीतीने तो हळूहळू मोठा होऊ लागला. शाळेच्या अभ्यासापेक्षा त्याचा खेळण्यावर जास्त लक्ष होता. घरी येऊन त्याने कधी ही पुस्तक उघडून अभ्यास केला नाही त्यामुळे आईला त्याची काळजी वाटायची. चौथी बोर्ड परीक्षेच्या काळात त्याने

अभ्यासाकडे लक्ष द्यावे म्हणून आईने विशेष करून वडिलांनी कडक सूचना केली. थोडा खेळ कमी करून त्याने बोर्डाचा अभ्यास केला आणि प्रथम श्रेणीत उत्तीर्ण देखील झाला. त्यापुढील शिक्षणासाठी शेजारच्या गावात जावे लागत असे. तो देखील त्या गावी जाण्यासाठी तयार झाला. तीन किमीवरच्या शाळेत काही मित्रासोबत चालत जायचा. त्या गावात एका श्रीमंत व्यक्तीच्या घरी एक टीव्ही होती. नुकतेच रामानंद सागर यांचं रामायण ही मालिका चालू झाली होती. ती मालिका दर रविवारी सकाळी नऊ वाजता दाखविल्या जायचे. गावात तर कोणाच्या घरी टीव्ही नव्हती. सुट्टी असून देखील गोट्या रामायण मालिका बघायला त्या गावात जायचा. छोटंसं घर सर्वजण दाटीवाटीने बसून बघायचे. मालिका संपल्यावर घराचा रस्ता धरायचा. रस्त्याने मग त्याच मालिकेविषयी चर्चा व्हायची. घरात कोणाला कळू नये म्हणून बॅट बॉल सोबत घेऊन जायचं आणि कोणी विचारलं कुठं गेला होता तर उत्तर ठरलेलं असायचा क्रिकेट खेळायला. रामायणची प्रसिद्धी पाहून त्या गावातील एकाने कलर टीव्ही आणली आणि रामायण बघायला पैसे लावले. कलर टीव्ही बघण्याची हौस पूर्ण करण्यासाठी सर्व मित्र एकत्र येऊन पैसे जमवायचं आणि कलर टीव्हीवर रामायण बघण्याचा आनंद घ्यायचा. एक दोन वर्षात मग गावातच एकाने टीव्ही आणली मग बाहेर गावी बघायला जाणे बंद

झाले. मात्र शाळा बुडवून फिल्म बघण्याचा सपाटा चालू झाला. या शाळेत मात्र काही कडक शिस्त होती. रोज दोन वेळा हजरी व्हायची. अपसेन्ट असलं की दुसऱ्या दिवशी हातावर छडी पडायची. रोज वही पूर्ण करणे, शब्द पाठ करणे, शुद्धलेखन लिहिणे ही कामे करावे लागत असे त्यामुळे त्याला गोट्या खेळायला खूपच कमी वेळ मिळत असे. तरी देखील तो गोट्या खेळणे सोडत नसे. रिंगणात सर्व गोट्या टाकायचे आणि सांगितलेली गोटी उडवायची, एक खोल गड्डा करायचा त्यास गल म्हणायचे, रेषेच्या आत सर्व गोट्या टाकायचे, गलीत जर गोटी पडली तर तीन वेळा मारण्याची संधी मिळायची अन्यथा एक वेळा. असेच दोन गल असलेला खेळ असायचा, त्या खेळात दोन्ही गल मध्ये एक एक गोटी पडली तर सर्व गोट्या जिंकले जायचे. या सर्व खेळात नेम धरून गोटीला मारणे खूपच महत्वाचे असायचे आणि त्यात गोट्या खूपच तरबेज होता. त्यानंतर हाताच्या मधल्या बोटाने टिचकी मारण्याचा खेळ कोण्या तरी झाडाखाली किंवा पडवीमध्ये रंगात यायचा. राजा राणी, टिक बॉम्ब, आस यासारखे अनेक खेळ गोट्या सहज जिकायचा. त्यामुळे सहसा कोणी ही त्याच्या सोबत खेळायचं नाही. म्हणून तो आपल्या पेक्षा मोठ्या असलेल्या मुलांसोबत खेळायचा. त्यांना ही जिंकू द्यायचा नाही. त्यामुळे अनेकदा वाद आणि भांडणं व्हायची. फक्त हेच नाही तर विटी दांडू, भोवरा,

क्रिकेट यांसारखे खेळ देखील खेळायचा. त्याचा नेम सर्वात चांगला असल्यामुळे तो शक्यतो हारायचा नाही. घरात जे काही रिकामे डबे होते त्यात नुसत्या गोट्याच होत्या. गोट्यामुळे एक फायदा झाला. त्याचं गणित विषय खूप पक्के झाले. शंभर पर्यंतची अचूक गिणती असेल, मिसळणे म्हणजे बेरीज करणे आणि काढून टाकणे म्हणजे वजाबाकी करणे या क्रिया अचूक सोडवू लागला. एका काचेच्या भरणीत तो पन्नास गोट्या टाकून ठेवायचा आणि दुकानात ते दिल्यावर त्याला पंचवीस पैसे यायचे. यामुळे त्याला गुणाकार देखील चांगले जमू लागले. इतर विषयापेक्षा गणित त्याला जास्त आवडू लागले. दुकानात पैश्याला एक गोटी मिळायची आणि हा मित्रांना आणि दुकानात देखील पैश्याला दोन गोट्या देऊन पैसे गोळा करायचा. गोट्या खेळता खेळता त्याला पैसे खेळायचा नाद लागला. पैसे मिळावे म्हणून आईचे ही लहान मोठे काम करून पैसे मिळवायचा. शाळा सुटल्यावर शेण गोळा करणे, हौदात पाणी भरून ठेवणे, दळण दळून आणणे असे काम तो मदत म्हणून नव्हे तर पाच-दहा पैसे आईकडून मिळविण्यासाठी करायचा. हे पैसे घेऊन मोठ्या मुलांसोबत आणि माणसासोबत तो पैसे ही खेळू लागला. ही गोष्ट जेंव्हा त्यांच्या वडिलांच्या कानावर गेली. तसे त्याचे वडील त्याच्यावर खूप रागावले. हा असाच खेळत राहिला तर वाया जाईल म्हणून त्यास शहरातल्या शाळेत नेऊन टाकले.

येथून गोट्याचे जीवन पार बदलून गेले. त्याला खेळायला कोणी साथीदार मिळत नव्हता. सर्वच मुले शाळा आणि घर यातच व्यस्त असायची. तो गावी आला की मनसोक्त खेळायचा आणि परत शहरातल्या शाळेत जायचा. याचठिकाणी त्याला अभ्यासाचे मर्म कळाले. तो हळूहळू आपला खेळ कमी केला आणि अभ्यासात लक्ष द्यायला लागला. दहावीची परीक्षा विशेष श्रेणीत पास झाल्यामुळे शाळेत त्याचा सत्कार झाला होता. त्याचे जे साथीदार गावात राहिली ते गोट्याच्या यशाकडे आश्चर्याने पाहू लागली. तो मात्र या यशात खेळाचेच गमक आहे असे मनाला सांगत होता. खेळामध्ये जी जिद्द, चिकाटी, संयम आणि अवधान होतं, त्याचाच वापर अभ्यासात केल्यामुळे हे यश मिळविता आलं असा तो आपल्या भाषणात बोलताना सांगितले. चला जेवायला बसा या आवाजाने तो शुद्धीवर आला. खरोखरच लहानपणीचे दिवस सोन्याचे होते, आज ती मजा नक्कीच नाही असे मनात म्हणत तो जेवायला बसला.

# 09) चूक

विजयची घराची परिस्थिती फारच बेताची. घरात आई वडील आणि दोन बहिणीसोबत तो राहायचा. घरात तोच मोठा असल्यामुळे आई बाबांच्या कामात त्यालाच मदत करावी लागत असे. गावात सातवी पर्यंत शाळा होती म्हणून सातव्या वर्गापर्यंत तो शिक्षण पूर्ण केला. त्यापुढील शिक्षणासाठी बाहेरगावी जाणे त्याला शक्य नव्हते. म्हणून तो आपले शिक्षण सोडून देऊन गावात मिळेल ते काम करू लागला. गावात जास्तीत जास्त बांधकाम करण्याचे काम केल्या जात असत त्यामुळे तेच काम विजय करू लागला. हळूहळू तो त्या कामात मजुरदार वरून मिस्त्रीचे काम करू लागला. त्याच्या हातात बऱ्यापैकी पैसा खेळू लागला होता. पण घरात दोन बहिणी असल्यामुळे त्यांच्या लग्नाची चिंता आई बाबांना खात होती. हे त्यांच्या चेहऱ्यावरून स्पष्ट होत होते. म्हणून विजय ने मोठ्या शहरात जाऊन काम करण्याचा निर्णय घरात सांगितला. त्याच्या आई बाबाने त्यास खूप विरोध दर्शविला पण विजय ऐकण्याच्या तयारीत मुळीच नव्हता.

एके दिवशी तो जवळच्या मोठ्या शहरात आपल्या सायकलवर गेला. दिवसभर खूप फिरला पण त्याला कोठे ही काम

मिळाले नाही. त्याला खूप दुःख वाटले. कोणी ओळखीचे नाही तर काम कुठून मिळणार. काही दिवस असे तसेच निघून गेले. शहरातील एक मोठा बांधकाम कारागीर मजूर लोकांच्या शोधात त्या गावात आला. भरपूर पैश्याची आमिष दाखविली. विजयने देखील त्याच्या बोलण्यात आला. वर्षाची काही आगाऊ रक्कम घेऊन विजय त्या कारागिरांच्या बांधकामावर जाण्यास निघाला. तो कारागीर राहण्याची आणि खाण्याची देखील व्यवस्था केली होती. त्यामुळे आई बाबांना देखील त्याची काळजी वाटत नव्हती. मोठ्या बहिणीच्या लग्नासाठी लागणारी अर्धी रक्कम मिळाली होती. एका वर्षात अजून तेवढी रक्कम कमावून आणून तिचा लग्न करण्याचा निश्चय केला होता. आपल्या बॅगमध्ये रोज लागणारी कपडे, अंथरूण आणि पांघरूण घेऊन। विजय कामासाठी निघाला. गावापासून शे दोनशे किमी दूर असलेल्या शहरात त्याचे मन हळूहळू विसावले. रोज सकाळी सात वाजता कामावर जायचे आणि सायंकाळी सहा वाजता काम संपवायचे. जिथे काम चालू होते तेथेच त्याची राहण्याची व जेवण्याची व्यवस्था केलेली होती. त्यामुळे त्याला कुठे जाण्याची गरज नव्हती. रविवारी त्याला सुट्टी राहत असे म्हणून त्यादिवशी तो कधी फिक्चर पाहायला जात असे, कधी बाहेरच एखाद्या हॉटेलमध्ये जेवण करायचा. त्याला त्या कामावर रमेश नावाचा एक मित्र भेटला. जो की विजय सोबतच

त्या बांधकामवर काम करायचा. हळूहळू काही दिवसानंतर त्यांच्या दोघांची मैत्री झाली. रमेश स्वभावाने चांगला होता मात्र त्याला दारू पिण्याची सवय होती. एका रविवारी तो आणि विजय एक फिक्चर पाहिले. सायंकाळी एका धाब्यावर जाऊन जेवण करण्याचा बेत होता. तसे दोघे ही एका हॉटेलवर गेले. रमेशने आपल्या खिशातून एक बाटली काढली आणि ग्लासमध्ये भरलं. तो विजय साठी पण एक ग्लास भरू लागला होता पण विजय ने नकार दिला. रमेशने खूप विनंती केली पण तो दारू घेतला नाही. त्या रात्री ते जेवण करून घरी येऊन झोपी गेले. असे दोन तीन रविवार गेले. एका रविवारी मात्र विजय स्वतः ला आवरू शकला नाही आणि थोडी दारू आपल्या घशाखाली घातली. त्याला त्याची चव काही कळली नाही मात्र थोडा वेळ ह्या संसारातून दुसऱ्या जगात गेल्याचा भास झाला. दारू पिण्याची त्याची गोडी हळूहळू वाढत गेली. आता दर रविवारी विजय दारू पिऊ लागला. तो ज्या धाब्यावर दारू प्यायला जात असे त्याच्या धाब्यावर वेश्या व्यवसाय देखील चालत होता. हे विजय ला माहीत नव्हते. तो फक्त दारू पिऊन निघून जायचा. तो या दुष्टचक्रात कधीही अडकला नसता जर त्याच्या सोबत ही घटना घडली नसती तर. तो त्या रविवारी एक एक पॅग पीतपीत खूप दारू पिला. त्याला काही भान राहिले नव्हते. तो जागेवरून उठता ही आले नाही. तो तेथेच

लुडकला. धाब्याचे मालकाने त्याला उचलले आणि घरात नेऊन टाकले. तिथे घरात एक बाई होती. ती दररोज विजयला दारू पिताना पहायची आणि एक ना एक दिवस विजयसोबत वेळ घालविण्याची स्वप्न पहायची कारणही तसेच होते. विजय पंचविशीतला तरुण पिळदार शरीर यष्टी देखणा रूप नसले तरी मुलींना आकर्षण करेल असा तो दिसत होता. याच संधीचा फायदा घेऊन तिने मदहोश विजयला निर्वस्त्र करून त्याच्या सोबत रात्र रंगून टाकली. सकाळी उठल्यावर विजय धाब्यावरच्या घरात पाहून चक्रावून गेला. त्यालाकाही तरी विचित्र वाटत होते. तो कामावर जायचे म्हणून निघून गेला. त्या रात्रीची त्याला राहून राहून आठवण यायची आणि तो अस्वस्थ व्हायचा. रविवारची तो आतुरतेने वाट पाहायचा. त्या रविवारी तो धाब्यावर गेला. दारूचे दोन तीन पॅग घातले आणि त्या घरात शिरला. ती घरात त्याची वाट पाहतच होती. त्याला त्या रात्री अजून जास्त वेगळा अनुभव आला. तो आता पूर्णपणे दारू आणि बाईच्या आहारी गेला होता. इकडे गावाकडे बहिणीची सोयरीक झाली होती आणि लग्नाचे दिवस जवळ आले होते. पंधरा दिवसाची सुट्टी घेऊन आणि काही पैसे व्हेउन त्या लग्नासाठी विजय गावी परत आला. दोन दिवस गावात सगळयांच्या गाठी भेटी मध्ये गेले. तिसऱ्या दिवशी त्याला दारूची आणि बाईची आठवण आली. पण गावात तर काही व्यवस्था

नाही. तो अस्वस्थ होऊ लागला. बहिणीचे लग्न झाले की तो पुन्हा शहरात कामावर गेला. यावेळी त्याला कामाची नाही दुसऱ्याच गोष्टीची आस लागली होती. तो पूर्णपणे आहारी गेला होता. आता काम देखील कमी करू लागला आणि धाब्यावर जास्त वेळ घालवू लागला. एके दिवशी त्याच्या अंगात खूप ताप चढली. त्याच्या मित्राने त्याला दवाखान्यात नेला. दोन तीन। दिवसानंतर ही त्याचा तापकाही केल्या उतरत नव्हता. तापीचे कारण समजून घ्यावे म्हणून डॉक्टरांनीत्याला रक्त आणि लघवी तपासण्याचा सल्ला दिला. तसे त्याने रक्त आणि लघवी तपासणीसाठी दिले. दुसऱ्या दिवशी रिपोर्ट मिळाला. रिपोर्ट पाहून डॉक्टरने विजयला बाजूला बसवून त्याच्या मित्राला सांगितले की विजय HIV +ve आहे. त्याच्या मित्राला धक्काच बसला. त्याने काहीही न बोलता विजयला घेऊन घरी गेला. दिवसामागून दिवस जात होते. विजयच्या अंगातील शक्ती हळूहळू कमी होत होती. त्याला थोडे काम केले की थकवा येऊ लागला. मित्राने त्याला परत आपल्या गावी जाण्याचा सल्ला दिला. तसा तो आपल्या गावी परतला. पिळदार शरीर यष्टीचा विजय अगदी बारीक दिसू लागला. त्याच्या चेहऱ्यावर कोणतेही तेज नव्हते. तिशीतला विजय पन्नास वर्षाचा वृद्ध दिसू लागला होता. गावी आल्यावर तो घरच्या बाहेर देखील निघत नव्हता. नेहमी झोपून राहत असे. गावात त्याच्या या वागण्याच्या बाबत

लोकंकाही बाही बोलू लागली होती. शेवटी एके दिवशी सायंकाळी जेवण करून तो झोपला तो कायमचा झोपला. रात्रीच्या झोपेतच त्याची प्राणज्योत मावळली. त्याच्या एका चुकीमुळे घरातला कर्ता सवरता तरुण मुलगा गेल्याचे त्या आई बाबांना खूप खूप दुःख होते. अशी चूक अनेक युवकांच्या जीवनात येते पण वेळीच युवकांनी स्वतःला सावरणे आवश्यक आहे.

# 10) धाडसी सुरज

प्रजासत्ताक दिनी महागाव येथील चौथ्या वर्गात शिकणाऱ्या सुरजचा दिल्ली येथे राष्ट्रपतीच्या हस्ते पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. याचा त्या सर्व गावकऱ्यांना आणि शाळेतील मुलासह मुख्याध्यापक आणि शिक्षकांना सुद्धा झाला होता. सुरज महागावच्या जिल्हा परिषदेच्या शाळेत चौथ्या वर्गात शिकत होता. शाळेत तसा तो हुशार नव्हता पण शिक्षकांनी सांगितलेले सर्व काम पूर्ण करीत होता. शिक्षकांचा तो आवडता विद्यार्थी होता कारण तो कोणाशी भांडण करीत नव्हता, सर्वांशी प्रेमाने राहत होता. त्याचे वडील तो पाच सहा वर्षाचा असताना वारले होते, त्यामुळे तो आई सोबत राहत होता. आईचा तो एकुलता एक मुलगा होता. आई शेतात मोलमजुरी करून आपला आणि आपल्या मुलाचे पोटभरीत होती. सुरजने केलेल्या धाडसी कामामुळे त्याच्या आईला देखील त्याचा अभिमान वाटत होता.

नुकतेच दिवाळीच्या सुट्या लागल्या होत्या. सुरजला मामाच्या गावी जावे असे वाटत होते. पण घरातील दिवाळीसोडून कसे जावे? म्हणून ती सुरजला समजावून सांगू लागली. पण सुरज आपला हट्ट सोडेना. शेवटी दिवाळी करून सायंकाळी मामाच्या

गावाला जाण्याचा वचन घेऊन सुरज आनंदात खेळायला गेला. दुसऱ्या दिवशी सकाळी पाडवा होता. सकाळी अभ्यंगस्नान करून दिवाळी साजरी झाली. घरात असलेले छोटे फटाके लावून सुरज दुसऱ्याच्या फटाके फोडताना पाहून उड्या मारत होता. हळूहळू दिवस संपू लागला होता तसे सुरजला मामाच्या गावाची प्रकर्षाने आठवण येऊ लागली होती. अखेर सायंकाळी 08 वाजण्याच्या सुमारास असलेल्या एक्स्प्रेस गाडीने गावी जाण्यासाठी आई आणि तो घराबाहेर पडले. दोन तासाच्या प्रवासानंतर तो रात्री दहा वाजण्याच्या सुमारास मामाच्या गावी पोहोचणार होते. रात्री आठ ला येणारी गाडी देखील लवकर आली नाही. सुरज गाडी येण्याच्या दिशेने सतत बघत होता. शेवटी एकदाची गाडी आली. एक्स्प्रेस असल्यामुळे गाडीमध्ये कुठेच जागा नव्हती. गाडीत प्रचंड गर्दी होती. शेवटी त्यांनी रिसर्वेशनच्या डब्यात ते दोघे ही शिरले. रात्रीचे नऊ वाजले होते त्यामुळे सर्व प्रवाशी जवळपास झोपेत होते. दोघे जण दरवाजाजवळ बसले. आईला झोप येऊ लागली, तिचा डोळा लागला. सुरज मात्र झोपला नव्हता. त्याने हळूच त्या डब्यात सर्वत्र नजर फिरविली असता त्याला एक माणूस त्या डब्यात फिरताना दिसत होता. त्याच्या हातात एक पिशवी होती. तो आत घुसत होता आणि बाहेर निघतानात्या पिशवीत काही तरी टाकत होता. सुरजला काही क्षण कळालेच नाही. जवळच्या सीटवर झोपलेल्या

माणसाला जगविण्याचा प्रयत्न केला असता तो काही केल्या उठत नव्हता. बेशुद्ध अवस्थेत झोपला होता. कायकरावं? हे सुरजला सुचत नव्हतं. त्याने पुस्तकात धाडसी हाली धडा वाचला होता. आपण काही धाडस केलो तरच आपण वाचू शकतो अन्यथा तो चोर होय तो चोरच होता. डब्यातील सर्वांना त्याने देवाचा प्रसाद म्हणून काही तरी खायला दिला होता. त्यामुळे सर्व जण बेशुद्ध झाले होते. सुरजने लगेच आपल्या सोबत असलेल्या पिशवीत पाहिलं काय काय सामान आहे? याची चाचपणी केली. त्या पिशवीत त्याला लाल मिरची दिसून आली. भावाला गावरान मिरची खूप आवडते म्हणून आईने पिशवीत दोन शेर मिरची सोबत घेतली होती. सुराजच्या डोक्यात क्षणात एक कल्पना सुचली. तो चोर सर्वांचे साहित्य घेत घेत सुरजच्या जवळच्या माणसाजवळ आला. आई पूर्ण झोपेत होती. सुरजने झोपेचे सोंग घेतले. जसे त्या चोराने त्या माणसाच्या गळ्यातील सोन्याच्या चैनवर हात टाकणार तसे सुरजने चोराला काही कळायच्या आत खालून मिरचीची पूड त्याच्या डोळ्यात टाकून दिली. तो चोर डोळे चोळत मोठ्याने आरडाओरडा करू लागला. त्याला अत्यंत वेदना होत होते. सुरजनेलगेच त्याच्या हातातील पिशवी हिसकावून घेतली आणि आपल्या आईला जागा केला. प्रचंड गोंधळ आणि आरडाओरडामुळेइतर डब्यातील माणसे त्या डब्यात आली.

सुरजने सर्वांना घडलेली सारी हकीकत सांगितली. प्रवाशांनी त्या चोराची बेदम धुलाई केली. पुढच्या स्टेशनला त्याला रेल्वे पोलिसांच्या स्वाधीन केले. गाडी त्या स्थानकावर काही वेळ थांबली, ज्यांचे त्यांना वस्तू परत करण्यात आले. सर्वांनी सुरजचे खूप खूप आभार मानले. चोराला रेल्वे पोलिसांनीअटक केले आणि गाडी पुढे सुटली. मामाचे गाव येईपर्यंत त्या डब्यातील प्रवाशी सुरजची स्तुती करण्यात मग्न होते. दुसऱ्या दिवशी सकाळी ही बातमी सर्वांना कळाली. सर्व पेपरवाले ही बातमी पहिल्या पानावर लावली. रेल्वेच्या अधिकाऱ्यांनी धाडसी सुरजची कहाणी रेल्वे मंत्री पर्यंत पोहोचविली. रेल्वे मंत्र्यांनी ही बाब पंतप्रधानामार्फत राष्ट्रपती पर्यंत पोहोचविली आणि प्रजासत्ताक दिनी त्याचा गौरव करण्यात आला. सुरजने काही क्षणात आपले डोके चालविले म्हणून अनेक प्रवाश्याचे दागदागिने आणि पैसे चोरी होण्यापासून वाचले होते.

# 11).बहिणीची शपथ

तारा आज दवाखान्यात मृत्यूशी झुंज देत होती आणि तिचा भाऊ मोहन हतबल होऊन तिच्या शरीराकडे पाहत उभा होता. दोनच दिवसापूर्वी ताराचे संपूर्ण शरीर भाजले होते, स्वयंपाक करतांना गॅसचा भडका उठला आणि तिचे शरीर जळाले असे तिच्या सासरचे म्हणणे होते पण सत्य काही वेगळेच होते. मोहनला सारे सत्य माहीत होते पण तारामूळे तो काही बोलू शकत नव्हता. तिने एक दोनदा सासरच्या लोकांनी तिचा कसा छळकरत आहेत हे बोलून दाखविले होते पण त्याबाबतीत मोहन ला देखील काही करता येत नव्हते. ताराच्या नवऱ्याला ऑटोमोबाईलचे दुकान टाकायचे होते आणि त्यासाठी पाच लाख रुपयांची गरज होती. ताराने आपल्या भावाकडून ते पैसे आणावेत अशी त्यांची मागणी होती आणि त्याच कारणावरून तिला रोज त्रास दिला जात असे. मोहन एका कंपनीमध्ये नोकरी करायचा त्यामुळे त्याच्याकडे देखील तेवढे पैसे नव्हते तो तरी कुठून आणणार? हे ताराला माहीत होतं, त्यामुळे ती कधी त्याला पैसे मागितली नव्हती. पण अचानक एके दिवशी मोहन जेंव्हा तिच्या सासरी गेला होता, त्याला जे दृश्य दिसले ते पाहून तो हबकून गेला. तारा आपल्या खोलीत रडत

बसली होती आणि मोहन अचानक तेथे गेला. ताराला त्याने खूप विचारणा केली पण ती काही बोलेना. पाच दिवसांपूर्वी त्यांचे फोनवर बोलणे झाले आणि तिने सर्व कहाणी सांगितली. माझ्या जीवाचं काही बरंवाईट झालं तरी ही गोष्ट कोणाला सांगू नको अशी शपथ ती त्याला घातली होती. त्यामुळे मोहनच्या डोक्यात विचाराचं काहूर उठलं होतं पण तो ताराच्या शपथेमुळे उदास होता. तारा खरोखरच आकाशातल्या त्या चमकत्या ताऱ्यासारखी तेजस्वी आणि स्वाभिमानी होती. ती कधीच कोणापुढे हात पसरलेलं मोहनने पाहिलं नव्हतं. नावाप्रमाणे तिचे कार्य होते. लहानपणापासून तिने कष्टाशिवाय काही पाहिलेच नाही. तिच्या जीवनात संघर्ष आणि संघर्षच लिहिलेलं होतं.

मोहन पाच वर्षाचा असेल त्यावेळी त्यांची आई पार्वती देवाघरी गेली. त्यावेळी तारा जेमतेम आठ वर्षाची चिमुकली पोर. तिला घरातले सगळी कामे जमायची. धुणीभांडी, स्वयंपाक झाडलोट हे सारं ती करायची. आई गेल्यावर तिच्यावर घराची जबाबदारी अजून वाढली. तिचे शाळेत जाणे हळूहळू बंद झाले. कशीबशी चौथ्या वर्गापर्यंत ती शिकली. मोहन पहिल्या वर्गात प्रविष्ट झाला आणि तिची शाळा बंद झाली. तिचे वडील शंकर हे दुसऱ्याच्या शेतात मोलमजुरीने काम करायचा. घरात लागलेली वस्तू आणून द्यायचा पण पार्वती गेल्यापासून तो ही जरा बेचैन

झाला होता. सायंकाळी त्याला झोप लागत नसे. त्यामुळे तो रोज सायंकाळी पिऊन येऊ लागला. मनातल्या मनात तो कुढत होता. त्याचे ही वय ते किती? पसतिशीच्या वयाचा शंकर, तो पार्वतीच्या विचाराने रात्रभर जागे राहायचा. त्याच्या काही मित्रांनी त्याला दुसरे लग्न करण्याचे सुचविले. तो यावर खूप विचार केला. पुढील दिवस सहचारी विना राहणे शक्य नाही म्हणून त्याने दुसरे लग्न केले. गावातीलच सुंदरा नावाची मुलगी जीचे एक लग्न होऊन मोडले होते, तिच्यासोबत एक नवा संसार सुरू झाला. तारा आणि मोहन यांना देखील आनंद झाला. नवीन आई त्यांना मिळाली होती. सुरुवातीचे काही दिवस मजेत आणि आनंदात गेले. एके दिवशी ताराने बाबाला म्हणाली, ' बाबा, मी शाळेला जाऊ का? ' यावर बाबांनी होकार दिला. दुसऱ्या दिवशी ती सकाळी शाळेला जाण्यास तयार झाली तेंव्हा सुंदरा ने तिला शाळेला जाण्यास अटकाव केला, ती म्हणाली, ' काय करतेस शाळा शिकून, ही घरातली कामे कोण करावी? शाळा बिळा काही नाही, ठेव ते दप्तर आणि काम कर ' हे ऐकून ताराला रडू आले. मोहन एकटा शाळेत गेला, जाताना त्याच्या ही डोळ्यात अश्रू गळत होते. मोहनचा जीव शाळेत लागत नव्हता. सायंकाळी घरी गेल्यावर मोहन ताराला म्हणाला, ' मी पण शाळेत जात नाही, मला तरी शाळा शिकून काय करायचं आहे? मी तुला कामात मदत करतो.' यावर टीव्ही बघत

बसलेली सुंदरा म्हणाली, ' हे बेस हाय बघ, तू पण शाळेला नको जाऊस, दोघे मिळून काम करा ' ताराला मोहनचा खूप राग आला आणि ती म्हणाली, ' ते काही नाही तुला शाळा शिकावचं लागंल, शिकून खूप मोठं व्हावं लागंल ' असे म्हणत ती रडू लागली. रात्री शंकर घरी आल्यावर मोहनने सर्व कहाणी सांगितली तेंव्हा शंकर म्हणाला, ' आईचं बरोबर आहे, तारा शिकून काय करणार? तू शिक आणि ताराला घरी राहू दे.' तारा आणि मोहन एकाच अंथरुणात झोपी गेले. सुंदरा आई सुरुवातीला खूप छान वागली मात्र पुढे पुढे तारा आणि मोहनला त्रास देऊ लागली. त्यांचं घरात राहणं तिला अवघड वाटू लागली. हे दोघे घरातून पळून जावं अशी ती त्यांच्यासोबत वागू लागली. ताराला खूप कामे करावी लागत होती तर मोहनला शाळा करून आल्यावर कामे करावी लागत असे. आपल्या आईच्या आठवणीत ते दोघे खूप रडायचे. शंकर समोर सुंदरा चांगली वागायची आणि माघारी मात्र छळ करायची. चंद्रकोराप्रमाणे दोघे ही वाढत होते. तारा उपवर झाली होती. त्यामुळे एकदाचे तिचे लग्न लावून द्यावे असा विचार सुंदराच्या मनात घोळतच होते. जवळच्या गावातील तिच्या ओळखीच्या एका घरातील पाहुणे बघायला आले आणि ताराला पसंद देखील केले. मोहन त्यावेळी पाचव्या वर्गात शिकायला होता ज्यावेळी ताराचे लग्न ठरले. ताराचे लग्न वाजत गाजत झालं आणि येथे

मोहन एकटा पडला. सुंदरा त्याला खायला देत नव्हती आणि कामे तर भरपूर सांगायची. ताराचे सर्वच काम मोहनला करावं लागू लागले. त्यामुळे शाळेकडे देखील दुर्लक्ष होऊ लागलं. मोहनला ते सारे झेपानासे झालं तसं तो एके दिवशी ताराच्या घरी गेला. तिला सर्व कहाणी सांगितली आणि तेथे जाणार नाही व राहणार नाही असे सांगितलं. यावर तारा म्हणाली मग कुठं राहणार? मोहन म्हणाला तुझ्याजवळ राहतो. तू सांगेल ती कामे करतो पण तिथं जाणार नाही. सासरच्या लोकांना ताराने कसेबसे समजावून सांगितले तेंव्हा कुठं त्यांनी मानलं. ताराचा सासर म्हणजे दहा माणसांचे कुटुंब आणि त्यात मोहन अकरावा. या सर्वांचे कामी फक्त तारा एकटी करत होती. हे सारं पाहून मोहन मनोमनी दुःखीकष्टी झाला. काय हे नशीब ! म्हणून तो मनातल्या मनात रडू लागला. ताराचे दुःख कमी व्हावे म्हणून तिच्या सासरी तो खूप कामे करत होता, ज्यामुळे ताराला ही बरे वाटत होते. एक नोकर गडी मोफत मिळाला म्हणून सासरचे सर्व मंडळी खुश होते. दिवसामागून दिवस सरकत होते. ताराच्या जीवनात दोन गोंडस मुले जन्माला आली. मोहन मामा झाला. दुःखाची पर्वा न करता तारा आणि मोहन काम करत होती आणि सुखात राहत होते. मोहन कसाबसा दहावी पास झाला आणि त्यानंतर त्याने आयटीआयला प्रवेश घेतला. मुळातच काम करण्याची सवय त्यामुळे त्याला

आयटीआय मध्ये काम करतांना कंटाळा आला नाही. ताराची मुलं आता शाळेला जाऊ लागली. ताराचा नवरा मेकॅनिक होता, मिळेल ते काम करता होता, पण त्याच्या अंगात एकचअवगुण होतं ते म्हणजे आळस. त्याच्या माघारी मोहनच त्याचा दुकान चालवायचा आणि आलेला पैसा देऊन टाकायचा. कधी एक पैसा आपल्या खिशात ठेवला नाही. त्याच्या आयटीआयमध्ये असलेल्या सोबतच्या मित्राला एका कंपनीत चांगली नोकरी मिळाली होती. त्याने मोहनला देखील घेऊन गेला. मोहनची हुशारी पाहून मालकाने लगेच त्याला कंपनीमध्ये घेतलं. त्याला महिन्याचा चार आकडी पगार मिळू लागला. काही महिने त्याने पैसे ताराकडे पाठविले पण तारानेच पैसे पाठवू नको, तुझ्याकडे जमा ठेव असे सांगितले. त्यावेळी मोहनला काही कळाले नाही. तारा स्वाभिमानी होती त्यामुळे तिने पैसे पाठविण्यास नकार दिला. असेच काही दिवस आणि वर्ष संपले. कामाच्या व्यापामुळे तारा खूपच कमजोर होऊ लागली. तिच्या तब्येतीकडे कोणी ही लक्ष देत नव्हते. मोहन काही दिवस पैसे पाठवून बंद केल्याने सासरची मंडळी तिला पैशाचा तगादा लावू लागले. आमच्या आशीर्वादामुळे आणि मदतीमुळे तुझ्या भावाला चांगली नोकरी मिळाली म्हणून परतफेड म्हणून त्याने पाच लाख रु द्यायला हवे. आम्हांला ऑटोमोबाईलचं दुकान टाकायचं आहे, त्यासाठी तू पैसे माग असे रोज तिला तगादा

देऊ लागले. तारा मात्र पैसे मागण्यास नकार देऊ लागली. एके दिवशी मोहन सुट्टी घेऊन अचानक जेंव्हा तिच्या सासरी गेला होता, त्याला जे दृश्य दिसले ते पाहून तो हबकून गेला. तारा आपल्या खोलीत रडत बसली होती आणि मोहन अचानक तेथे गेला. ताराला त्याने खूप विचारणा केली पण ती काही बोलेना. म्हणून तो तसाच निघून गेला. पाचच दिवसांपूर्वी त्यांचे फोनवर बोलणे झाले आणि तिने सर्व कहाणी सांगितली. माझ्या जीवाचं काही बरंवाईट झालं तरी ही गोष्ट कोणाला सांगू नको अशी शपथ ती त्याला घातली होती. ती आपल्या सासरच्याना अडचणीत आणू इच्छित नव्हती. सासरच्या लोकांबद्दल तिच्या मनात खूप जिव्हाळा होता कारण ते पैश्यासाठी तिचा छळ करत असले तरी ते सुंदरा सारखे दुष्ट नव्हते. त्यातच ती धन्य मानत होती. मोहनने सासरच्या लोकांवर काही कारवाई करावी, त्याचा त्रास मोहनला ही होणार सासरच्या लोकांना ही होणार म्हणून ती मोहनला शपथ दिली होती की, तू काही बोलू नको. मोहन हतबल नजरेने काचेतून ताराच्या शरीराकडे पाहत उभा होता. आज भाऊ आणि बहीण यांच्या प्रेमाच्या परीक्षेची घडी होती. भावाने परमेश्वराकडे ताराच्या जीवनदानाची भीक मागत उभा होता.

# 12) लेक वाचवा, लेक शिकवा

गेल्या चार दिवसापासून राणी शाळेत आली नाही म्हणून मोळे गुरुजी तिच्या घरी सकाळी सकाळी भेट दिली. राणी भांडे घासत होती आणि बाजूला धुणे ही पडलेले होते. तिची अजून अंघोळ व्हायचे बाकी होते. तिचा अवतार पाहून मोळे गुरुजीला कसे तरी वाटले. गुरुजींनी तिला सरळ प्रश्न केला,

" राणी चार दिवस झाले तू शाळेला का आली नाहीस? "

यावर ती म्हणाली, " सर, आईला बरं वाटत नाही, त्यामुळे आईने मला घरी थांबायला सांगितलं."

लगेच मोळे गुरुजी आईकडे वळले आणि विचारलं, " काय झालंय? " तेंव्हा राणीच्या आईने उत्तर देतांना म्हणाली, " सर माझं तबियत बरोबर राहत नाही. त्यामुळे माझ्याने काही काम करवत नाही. त्यासाठी राणीला घरी थांबवलं हो."

पाहायला गेलं तर राणी दुसऱ्या वर्गातील जेमतेम सात वर्षाची पोरगी. पण ती घरातील सारेच काम अगदी आईच्या कामासारखी सफाईदारपणे करते असे तिच्या घरच्या आजूबाजूचे शेजारचे बाया मोळे गुरुजीला सांगू लागल्या. मोलमजुरी करून आपले पोट भरणारे कुटुंब, आई-बाबा दोघे कमविली तर थोडं शिल्लक राहते.

त्यात आता आई पडली अंथरुणावर आणि बाबा जातात कामाला. आलेले सर्व पैसे खर्च होतात. त्यात मध्येच दवाखाना निघाला तर पूर्ण आर्थिक परिस्थिती कोलमडून जाते. असाच विचार डोक्यात घेऊन मोळे गुरुजी शाळेत गेले तर शाळेत केंद्रप्रमुख आलेले त्यांनी लेक वाचवा लेक शिकवा अभियानविषयी परिपत्रक दिले आणि माहिती सांगितली. मोळे गुरुजी नुकतेच राणीच्या घरी भेट देऊन आले होते त्यामुळे तिच्या विषयी विचार मनात घोळतच होते. लगेच उभं राहून मोळे गुरुजीनी मनातील दुःख सरांजवळ बोलून दाखविले आणि सर्व परिस्थिती सांगितली. केंद्रप्रमुख साहेब खूपच दयाळू होते त्यांनी लगेच राणीच्या घरी भेट देण्याचे ठरविले. मोळे गुरुजी आणि केंद्रप्रमुख परत राणीच्या घरी गेलोत. तेथील परिस्थिती पाहून केंद्रप्रमुख साहेब गहिवरले आणि लगेच ताबडतोब दवाखान्यात घेऊन जाण्याचे ठरविले. शहरातील मित्राला फोन लावून सरांनी गाडी बोलावून घेतले. काही वेळातच ती गाडी आली आणि दवाखान्याकडे निघाली. मोळे गुरुजी शाळेत गेले आणि मुख्याध्यापकांना सांगून दवाखान्यात जाण्यास निघाले. राणीच्या आईला लगेच दवाखान्यात ॲडमिट करण्यात आले. डॉक्टरांनी राणीच्या आईला तपासले आणि लवकर आणलेले बरे केले, डेंग्यूची शिकायत आहे आणि पहिल्या स्टेजवर आहे, असे म्हणू लागले. आपल्या येथेच कवर होऊ शकते पण चार दिवस

राहावे लागेल. राणी आणि राणीची आई दवाखान्यात राहिले. इकडे राणीचे बाबा कामावरून परतले. शेजारच्यांनी सर्व माहिती दिल्यावर ते देखील दवाखान्यात आले. चार दिवसांनी आजारातून पूर्ण तंदुरुस्त झाल्यावर ते परत आपल्या गावी आले. दुसऱ्या दिवशी सकाळी राणीची आई राणीला घेऊन शाळेत आली आणि सरळ मोळे गुरुजीचे पाय धरू लागली. तेंव्हा मोळे गुरुजी म्हणाले, " माझे पाय कशाला धरता, केंद्रप्रमुख साहेबांमुळे हे सर्व घडलं, त्यांचे धन्यवाद माना, कोणताही आजार अंगावर काढू नये. लगेच दवाखान्यात जाऊन तपासणी करून घ्यावी आणि राणीला रोज शाळेत पाठवा." राणीच्या आईला मोळे गुरुजीचे म्हणणे पटले, तिने पक्का निर्धार करत " राणीला रोज शाळेत पाठविणार " असे बोलली. लेक वाचवा ; लेक शिकवा अभियान काही अंशी सफल झाल्याचे समाधान मोळे गुरुजी चेहऱ्यावर दिसू लागले.

# 13) भाषेचा प्रश्न

मोहन काही दवाखान्याच्या निमित्ताने शेजारच्या तेलंगणा राज्यात गेला होता. त्याच्या जवळच्या मित्रांचे वडील येथील मोठ्या हॉस्पिटलमध्ये ऍडमिट होते. त्यांना पैश्याची गरज होती म्हणून तो बसने प्रवास करत तेथे पोहोचला. पण तेथे त्याला अनेक संकटाचा सामना करावा लागला. मुळात तो सातवी नापास होता, त्याला मराठी सोडून कोणतीच भाषा बोलता येत नव्हते आणि समजत देखील नव्हते. त्या भागात सर्वजण तेलगू किंवा इंग्रजी भाषा बोलत होते जे की त्याला अजिबात समजत नव्हते. मोहन मराठीत बोलायचा जे की त्यांना समजत नव्हते. कोणती बस कोणत्या गावाला जाते? हे त्या लोकांना कसं विचारावं? हेच त्याला मुळी समजत नव्हते. काय करावं हे त्याला कळेना. त्याने फक्त गावाचेनाव उच्चाराव आणि बसचा पत्ता मिळवावे हेच दोन तीन वेळा करून कसा बसा तो शहरात पोहोचला. पण शहरातून त्या मोठ्या दवाखान्यात कसंपोहोचावे हा ही मोठा प्रश्नच होता. गावात सिटी बस चालू होते पण कोणती बस कुठे जाते हे त्याला कसे कळणार? कारण सर्व पाट्या तेलगू भाषेत लिहिलेले होते. त्याच्या डोक्याचा नुसता फालुदा झाला होता. पोटात कावळे

ओरडू लागले म्हणून एका हॉटेलात गेला. मोहनला खिचडी भजे किंवा पोहे खायची ईच्छा झाली, तसे त्याने त्याला सांगितले पण त्याने ही हाताचा इशारा करून ते काही मिळत नाही फक्त इडली, वडा, दोसा मिळते म्हणत त्याने चित्राकडे बोट दाखविले. हे सर्व त्याला आवडत नव्हते कारण हे खाल्याने पोट भरणार नाही याची खात्री होती. तरी त्याने एक प्लेटइडली वडा मागितला, कसेबसे खाऊन हॉटेलच्या बाहेर पडला. त्याच्या समोर एकच प्रश्न होता, हॉस्पिटलला कसे पोहचायचे. तो अनेकांना बोलूलागला मात्र त्याची मराठी भाषा त्यांना समजत नसल्यामुळे लोकंत्याच्याकडे वेगळ्याच नजरेने पाहू लागले. दूरवरून एक रिक्षावाला हे सारे पाहत होता. त्याने आपली तीन चाकी रिक्षा चालवत त्याच्याजवळ आला. जवळ येऊन म्हणाला, काय भाऊ, महाराष्ट्रातून आलात का? त्या तेलगूच्या शहरात मराठी कानावर पडताच मोहन आनंदित झाला. देवासारखा भेटलास म्हणून मोहन म्हणाला, होय, मी महाराष्ट्रातून आलोय. तुम्हाला मराठी येते? यावर तो रिक्षावाला म्हणाला, मराठी येते म्हणजे काय? मी पण महाराष्ट्राचा आहे. हे एकूण मोहनला खुप आनंद झाला. हा माणूस आपणाला नक्की या हॉस्पिटलला पोहोचवेल याचा त्याला विश्वास मिळालं. थोडीफार चौकशी केल्यावर त्याने दवाखान्यात घेऊन जाण्याचे मान्य केले आणि रिक्षामधून त्यांचा प्रवास सुरू झाला.

इथे कसे काय आलात?

गावकडे काम मिळेना म्हणून माझ्या एका मित्रांसोबत येथे आलो

ही रिक्षा तुमचीच आहे का?

नाही, ही रिक्षा मी भाड्याने चालवितो, रोजच्या रोज त्यांना किराया देऊन ही रिक्षा चालवितो.

रोज किती पैसे मिळतात?

कधी कधी दोनशे तिनशे मिळतात तर कधी कधी खिशातून किराया द्यावा लागतो.

तुम्हांला तेलगू बोलता येते का?

अगोदर येत नव्हती, पण हळूहळू कामपुरता तेलगू भाषा शिकून घेतली.

खरंच माणसाला आपली भाषा आलीच पाहिजे सोबत शेजारच्या प्रातांतील भाषा येणे देखील आवश्यक आहे.

होय, त्याशिवाय आपण दुसऱ्या राज्यात कसे जगू शकतो.

बोलता बोलता हॉस्पिटल आले, मोहन रिक्षाच्या खाली उतरला, त्याचे भाडे चुकते केले आणि हॉस्पिटलमध्ये गेला. आज

तो रिक्षावाला देवासारखे धावून आला म्हणून देवाचे त्याने मनोमन आभार मानले.

# 14) रेल्वेतील पहिला प्रवास

गणू आज खूपच खुश होता. कारण ही तसंच होतं, तो उद्या सकाळी पहिल्यांदा रेल्वेने गावाला जाणार होता. आजपर्यंत तो बाबासोबत सायकलने किंवा बसने शहरात गेला होता. मात्र त्याने रेल्वेने कधी ही प्रवास केला नव्हता. त्याच खुशी मध्ये त्याला कधी झोप लागली हे त्याच्या लक्षात देखील आले नाही. गणू तसा शाळेत शिकला असता तर दहाव्या वर्गात राहिला असता मात्र त्याने चौथी पर्यंत शाळा शिकली आणि बाबांच्या मागे बैल घेऊन शेतात जाऊ लागला. गणू मदतीला मिळाल्यामुळे बाबांना ही तेवढाच हातभार होत होता. कधी कुठे जाण्याचा प्रसंग आला तर गणू वर बैलाची जबाबदारी सोडून बाबा जाऊन येत असत. पण आज बाबांना एवढं जबाबदारीचं काम पडलं की, त्यांना बाहेर जाणे होत नाही म्हणून गणू ला सामान आणण्यासाठी पाठवावे लागत होते. गणुला ती एक सुवर्ण संधी वाटत होती. सकाळी सूर्य उगवण्याची अगोदरच तो उठला. सकाळच्या सर्व क्रिया संपन्न करून लवकरच तयार झाला. न्याहरी केली आणि रेल्वे स्टेशनकडे जाण्यास निघाला. गावापासून एक दोन मैल अंतरावर रेल्वे स्टेशन होतं. म्हणून बाबांकडून कामाचे पैसे घेतले आणि चालत स्वारी

निघाली. तासभरात गणू रेल्वे स्टेशनवर पोहोचला. ते एक छोटे स्टेशन होते म्हणून फार कमी लोकं त्याठिकाणी दिसत होते. काही वेळात झुक झुक करत रेल्वे आली. तसा गणू रेल्वेत बसला. चांगली ऐसपैस जागा पाहून त्याला खूप आनंद झाला. बस मध्ये आणि रेल्वे मध्ये त्याला खूप फरक जाणवत होता. बसमध्ये गुदमरल्या सारखं होते. तेथे मोकळे बसता येईना, लघवी व संडास ची तर सोयच नाही. म्हणून गणू ला रेल्वे खूपच आवडू लागली. थोड्याच वेळात गणूचे डोळे इकडे तिकडे फिरू लागले. बस मध्ये ज्याप्रकारे कंडक्टर येऊन तिकीट देतो, तसे कोणी येतात का? यासाठी त्याची नजर फिरू लागली. एक दोन स्टेशन गेले पण कंडक्टर काही येत नव्हता. तेवढ्यात एक व्यक्ती तिकीट तिकीट म्हणत गणूच्या जवळ आला. गणू म्हणाला " किती रुपये आहे तिकीट? " तो टी सी होता. म्हणजे तिकीट देणारा नाही तर तिकीट चेकर होता. तो एक वेळ त्याच्या कडे टकमक नजरेने पाहत राहिला आणि म्हणाला, " मी तिकीट देत नसतो, मी तिकीट चेक करत असतो, दाखव तुझं तिकीट." यावर गणूच्या चेहऱ्यावर प्रश्नार्थक आठ्या पडल्या. तो म्हणाला, " साहेब, मला माहित नाही, रेल्वेत तिकीट काढून बसावं लागतं ते. मी पहिल्यांदाच रेल्वेने प्रवास करीत आहे. साहेब मला माफ करावं." त्याचे बोलणे ऐकून टी सी ला दया वगैरे काहीच आले नाही कारण असे मंडळी त्याला रोजच

भेटत असतात. लगेच तो म्हणाला, " काही हरकत नाही, तिकीट न काढल्याबद्दल पन्नास रु. दंड भरावं लागंल." गणू ने का कु करत ते दंड भरला. बाजूचे सारेच लोकं गणू कडे आश्चर्य कारक नजरेने पाहत होते. मात्र यात गणूची काही एक चूक नव्हती. गणू एकदा बाबासोबत बस मध्ये गेला होता तेंव्हा बस मध्ये कंडक्टर येऊन त्यांचा तिकीट काढलं होतं. रेल्वेत सुद्धा अशीच सोय असेल असे त्याला वाटलं. पण झालं उलटंच. गणूचा रेल्वेचा हा पहिला प्रवास अजीवनभर लक्षात राहील असा झाला होता. सायंकाळी गावी परत येतना रेल्वे स्टेशनमध्ये तिकीट घेऊन तो रेल्वेत बसला आणि सुखरूप घरी परत आला.

# 15) मेहंदी

आज प्रणिताच्या घरात सर्वांची खूपच लगबग चालू होती. प्रत्येकजण आपापल्या घाईत होते आणि प्रणिता मात्र अगदी शांत बसून स्वतःला आरश्यात न्याहाळत होती. ती दिसायला सुंदर जरी नसली तरी नाकी डोळी छान, मध्यम बांधा आणि उंची सर्वसाधारण होतं. प्रणिताने लग्न करण्यास होकार दिला म्हणून घरच्यांची स्थळ पाहण्याची एकच घाई चालली होती. आज बाजूच्याच गावचे रामराव प्रणिताला पाहायला येणार होते. त्यामुळे घरातल्या सर्व मंडळींची जुळवाजुळव करण्याची घाई चालू होती. शेजारच्या गावचा रामराव म्हणजे एक चांगली शेत जमीन असलेला जमीनदार माणूस आणि त्याचा एकुलता एक मुलगा प्रसाद जो की पदवी पर्यंत शिक्षण घेतलं पण पुढील शिक्षण थांबवून आपल्या शेतीकडे लक्ष द्यायला लागला. नोकरीची कसलीही आशा न बाळगता आपल्या शेतीकडे लक्ष देऊन चांगले उत्पन्न काढत होता. स्वतः कष्टाळू आणि मेहनती असल्यामुळे शेतातील उत्पन्न दरवर्षी बऱ्यापैकी निघत होतं. बघता बघता प्रसाद चांगला पंचवीस वर्षाचा झाला होता. रामराव ला तीन मुली, पण मुलगा हवा या हट्टापायी कुलदेवताजवळ नवस बोलले अन चौथ्या वेळेस

त्यांना मुलगा झाला आणि त्याचं नाव ठेवलं प्रसाद. लाडात वाढलेला प्रसाद चंद्रकलेप्रमाणे मोठा होत गेला. आज त्याला मुलगी पाहण्यासाठी जाताना सर्वांना आनंद वाटत होतं. मोठ्या गाडीत आई-वडील, तीन बहिणी, त्यांचे नवरे आणि लेकरंबाळ असे सर्वजण मिळून गाडी एकदम पॅक झाली. गाडी धुरळा उडवित प्रणिताच्या घराच्या दिशेने निघाली. तासाभराच्या प्रवासानंतर गाडी प्राणिताच्या अंगणासमोर येऊन थांबली. सर्वजण गाडीतून उतरले. सर्वांचे घरात आवभगत स्वागत करण्यात आले. प्रसादचे डोळे मुलीला शोधत होते. काही वेळानंतर कांदा पोहे आले. सर्वांनी कांदे पोहेचा आस्वाद घेतले. प्रणिता आपल्या हातात चहाचा ट्रे घेऊन हळूहळू पावलाने बैठकीत आली. तिने आज तिच्या आवडत्या बदामी रंगाची साडी नेसली होती. त्यात ती पूर्वीपेक्षा ही सुंदर दिसत होती. सर्वांना चहा दिली आणि एका खुर्चीवर येऊन बसली. चहा पीत पीत रामराव प्रणिताला प्रश्न विचारले. ती देखील सर्व प्रश्नांची योग्य उत्तरे दिली. रामरावांच्या पत्नींने प्राणिताला कुंकू लावून हातात पाचशे रुपयांची नोट दिली आणि घरात जाण्याची परवानगी दिली. थोड्याच वेळांत सर्व पाहुणे आपल्या घरी जाण्यास निघाले. प्रणिताला पाहण्यास आलेले हे पहिलेच स्थळ होतं. प्राणिताच्या घरच्या सर्वांना हे स्थळ पसंद आले होते फक्त रामराव यांचा काय निरोप येतो? याकडे लक्ष

लागून होतं. प्रणिता देखील प्रसादला पाहून खुश होती. सायंकाळी निरोप मिळाला की, मुलगी पसंद आहे. प्राणिताच्या घरी सर्वांना खूप आनंद झाला. काही दिवसांनी साखरपुडाच्या कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले. या कार्यक्रमात प्रसादने प्रणिताला रेडमी चा एक नवा स्मार्ट फोन भेट म्हणून दिला. रीतसर सर्व क्रिया पडत चालले होते. प्रसाद आणि प्रणिता यांचे तासनतास फोनवर बोलणे चालूच असायाचे. पाहता पाहता लग्नाची तिथी जवळ आली. प्राणिताच्या दोन्ही हाताला मेहंदी लागली होती. अंग हळदीने पिवळे करण्यात आले होते. ठरल्याप्रमाणे प्रणिताच्या घरी लग्नाचा कार्यक्रम धुमधडाक्यात साजरा करण्यात आला. सगेसोयरे, नातलग, मित्रमंडळी यांनी या लग्नाचा पुरेपूर आनंद लुटला. सर्वांनी प्रसाद आणि प्रणिता यांचा जोडा छान शोभून दिसत असल्याचे बोलत होते. प्रणिता लग्न होऊन सासरी आली. तिच्या घरापेक्षा सासरचे घर जरासे मोठे होते. घरासमोर बगीचा होता. घरात एक मोठी चार चाकी गाडी, ट्रॅक्टर, दोन दुचाकी आणि एक स्कुटी असे वाहन होते. सर्व काही आलबेल होतं. तिच्या पदरी नशिबाने खूप सुख लिहून ठेवलं होतं. लग्न झाल्यानंतर प्रत्येक जोडपं कुलदैवताच्या दर्शनाला जातात तसं प्रसाद आणि प्रणिता आपल्या सर्व परिवारासह दर्शन करून घेतले. देवदर्शन झाल्यानंतर आज तिच्या जीवनातील एक अनमोल क्षण म्हणजे मधुचंद्राची तयारी

चालू होती. प्राणिताच्या मनात थोडासा रोमांस तर थोडी भीती ही जाणवत होती. जशी जशी सायंकाळ जवळ येऊ लागली तशी तिच्या भावना बदलत जात होत्या. पाचच्या सुमारास प्रसाद प्रणिताला काही तरी गिफ्ट द्यावं म्हणून शहराकडे आपली दुचाकी घेऊन निघाला. गावापासून दहा किमी अंतरावर एक मोठे शहर होते ज्याठिकाणी हवी ती वस्तू मिळत असे. एका तासात येतो असे सांगून प्रसाद बाहेर पडला. सायंकाळचे सात वाजले तरी ही प्रसाद घरी आला नव्हता. एका तासात परत येणारा प्रसाद अजून का आला नाही म्हणून रामरावांनी आपला मोबाईल काढलं आणि प्रसादला फोन लावला. लगेच तिकडून फोन उचलल्या गेलं आणि हॅलो, पाच दहा मिनिटांत येत आहे, गाडीवर आहे, गाडी चालवत प्रसादने आपल्या वडिलांना बोलला. तेवढ्यात समोरून येणाऱ्या एका गाडीने प्रसाद च्या गाडीला जोराची धडक दिली. रामराव इकडे फोनवर हॅलो, हॅलो म्हणू लागला पण तिकडून काहीच उत्तर येत नव्हते. काही तरी घात झालंय असा संशय आला आणि रामराव लगेच ड्रायव्हरला घेऊन शहराच्या दिशेला निघाले. चार-पाच किमी जातात न जातात रस्त्यावर गाडी पडलेली दिसत होती. ड्रायव्हरने लगेच गाडी थांबवली, रामराव खाली उतरले. पाहतात तर काय ती प्रसादचीच गाडी होती. थोड्या दूर अंतरावर प्रसाद रक्तबंबाळ अवस्थेत पडला होता. ड्रायव्हर आणि रामराव लगेच

त्याला उचलून गाडीत टाकले आणि शहराच्या दवाखान्यात ॲडमिट केले. प्रणिता इकडे फोनची।वाट पाहत होती. रामरावने प्रसादचा अपघात झाल्याची बातमी त्यांच्या बायकोला दिली मात्र प्रणिताला यातलं काही सांगू नको असं सांगितलं. प्रणिता घरात इकडून तिकडे येरझाऱ्या घालू लागली. प्रसादला लगेच अतिदक्षता विभागात दाखल करण्यात आले. तो मृत्यूशी झुंज देत होता. अपघातात प्रसादच्या डोक्याला जोराचा मार बसल्यामुळे तो शुद्धीवर नव्हता. डॉक्टरांनी चोवीस तास काही सांगता येत नाही असे सांगितले होते. प्रणिता इकडे वाट पाहून पाहून बैठकीतच झोपली होती. मधुचंद्र होता म्हणून तिचा बेडरूम फुलांनी सजविण्यात आला होता. सकाळ झाली. चिमण्यांच्या आवाजामुळे प्रणिता जागी झाली. प्रसाद आणि रामराव अजून ही घरी आले नव्हते, तिला त्यांची काळजी वाटू लागली. काय झाले असेल? असे विचार करत असतानाच अंब्युलन्स आपले सायरन वाजवत घरासमोर येऊन थांबली. प्रसादची डेडबॉडी बाहेर काढण्यात येत होतं. प्रणिताला काही सुचत नव्हते. मागोमाग रामराव आपल्या गाडीत आले. हे सर्व पाहिल्यावर प्रणिताने " प्रसाद " म्हणून एकच हंबरडा फोडला. प्रवादच्या डेडबॉडीला धरून प्रणिता जोरजोरात रडू लागली. लग्नाची हळद अजून निघाली नव्हती, हातावरील मेहंदी नुकतेच रंगात येऊ लागली

होती. तोच तिचा मधुचंद्राच्या दिवशीच संसार स्वप्नभंग पावला होता. रामरावने फोन केला नसता किंवा प्रसादने गाडी चालविताना फोन उचलला नसता तर कदाचित हा अपघात घडला नसता आणि प्रणिताचा संसार वाचला असता. म्हणून या लघुकथेतून एकच संदेश देऊ इच्छितो की, गाडी चालविताना मोबाईलवर बोलू नका. परिवारात आपल्यामुळे आनंदी आनंद असते, याची जाणीव ठेवा.

# 16) जादूची पिशवी

मनात आत्महत्येचा विचार करत करत विजय डोंगरावर चढत होता. उंचच्याउंच डोंगरावर चढून तेथून खाली उडी मारण्याचा त्याच्या मनात विचार चालू होते. अर्धे डोंगर चढून झाले होते. तसे ते डोंगर खूपच उंच होते, एका दमात कोणी सहजासहजी तिथे चढूच शकत नव्हते. विजय थकून गेला होता. थोडा वेळ एका छोट्या झाडाखाली थांबला आणि पुन्हा चढायला सुरुवात केली. चढताना तो घामाघूम झाला होता. काही वेळानंतर तो डोंगराच्या उंच शिखरावर जाऊन पोहोचला. तिथून खाली पाहिले तर माणसं, गाड्या अगदी लहान दिसत होते. आत्महत्या करण्याचा त्याचा विचार पक्का झाला होता. लोकांच्या रोजच्या बोलण्याने तो पुरता कंटाळला होता. घरचे व्यक्ती देखील त्याला समजून घ्यायला तयार नव्हते. त्याची पंचविशी उलटली होती आणि हातात काहीच काम नव्हते, कोठे नोकरी लागली नव्हती, पदवी पर्यंत शिक्षण झाल्यामुळे शेतात काम करायला जावेसे वाटत नव्हते, तेथील काम करण्यास त्याला लाज वाटत होती. त्याला त्याच्या दर्जानुसार नोकरी पाहिजे होती मात्र ते काही त्याला मिळत नव्हते. तो शिक्षणात हुशार होता मात्र त्याला शिक्षणाच्या आधारावर देखील

नोकरी मिळत नव्हती. घरातील सर्वच जण त्याला काम करण्याबाबत रोजच बोलायचे. खायचं आणि हिंडायचं एवढंच काम कर असे त्याचे बाबा त्याला म्हणायचे. विजयच्या मनात काम करण्याची खूप हौस होती मात्र त्याच्या मनासारखे काम न मिळाल्यामुळे तो गावात रिकामटेकडा नुसता फिरत राहायचा. या सर्व बाबीचा त्याला ही कंटाळा आला होता म्हणून आज आपलं जीवन संपविण्याचा तो विचार केला. त्याचे मन आत्महत्या करण्यास तयार झाले. तो त्या उंच डोंगरावरून उडी मारणार इतक्यात त्याला एक आवाज ऐकू आला, " विजय, हे काय करतोस?"

त्या आवाजाच्या दिशेने तोंड करून विजय म्हणाला, " आत्महत्या, मी कंटाळलो या जीवनाला, म्हणून संपवित आहे स्वतःला"

" पण तुला स्वतःला संपविण्याचा अधिकार तरी आहे का?"

" का नाही, माझा जीव आहे, मी संपवितो, कोण रोखतंय मला"

" जीव जरी आपला असला तरी त्याला संपविण्याचा अधिकार आपला नाही, ज्याने जन्म दिला तोच मृत्यू देखील देईल "

" नाही, मला आता जीवन जगावेसे वाटत नाही, मी मरणार म्हणजे मरणार "

" थोडा वेळ थांब, मी काय सांगतो ते ऐक ....."

असे म्हणत एक सुंदर परी त्याच्या समोर प्रकट झाली. विजयला स्वप्नात असल्याचा भास झाला म्हणून स्वतःला एक चिमटी देऊन पाहिला तर त्याला जाणवले की तो जागाच आहे. परीने विजयकडे एक कटाक्ष टाकून म्हणाली, " ही घे छोटी पिशवी, तुझ्या मनात जी इच्छा असेल ती ईच्छा या पिशवीत हात घातल्या बरोबर पूर्ण होईल. पण कोणाच्या समोर या पिशवीचा वापर करता येणार नाही". परीकडील पिशवी घेतली आणि खरे आहे का हे तपासून पहावं म्हणून मनात एक इच्छा ठेवली आणि पिशवीत हात घातला तर त्याला तीच वस्तू मिळाली. तो खूप आनंदी झाला. या जादूच्या पिशवीने तुझे जीवन सुखी होईल तेंव्हा आत्महत्या करण्याचा विचार मनात आणू नको. विजयने आत्महत्या करण्याचा विचार मोडीत काढला आणि लगबगीने डोंगर उतरून घरी जाऊ लागला.

सायंकाळ होत आली होती. घरी पोहोचला, हात-पाय धुतले आणि ती जादूची पिशवी खिशात ठेवून झोपी गेला. त्या जादूच्या पिशवी विषयी अनेक विचार आल्यामुळे त्याला रात्रभर झोप

लागली नाही. याचा काही तरी चांगला उपयोग करण्याचा विचार मनात आणून पहाटे पहाटे तो झोपी गेला. सकाळ झाली. तसा तो जादूची पिशवी घेतली आणि आपल्या शेताकडे एकटाच निघाला. शेतात पोहोचल्यावर जादूची पिशवी काढली आणि मनात इच्छा व्यक्त केली की, संपूर्ण शेत नांगरण्याची. काही क्षणात त्याचे पूर्ण शेत नांगरून तयार झाले. त्याच्या वडिलांना हे नांगरलेले शेत पाहून खूप आश्चर्य वाटले. याच जादूच्या पिशवीचा वापर करून विजयने शेतीची सर्व कामे पूर्ण करून घेतली. त्यावर्षी त्याला एवढा फायदा झाला की, त्याच्या घरचे संपूर्ण दारिद्र्य निघून गेले. गावात सर्वत्र विजयच्या कामाची चर्चा होऊ लागली. हे कसे शक्य आहे? असे प्रश्नार्थक चेहऱ्याने जो तो विजयला विचारत असे. मात्र विजय काही ही न बोलता थातूर माथूर बोलून टाळत असे. असेच काही वर्षे गेली आता विजय खूप श्रीमंत व्यक्ती झाला होता. त्याची शेती ही चांगल्यापैकी साथ देत होती. हळू हळू त्याला शेतातल्या कामाचे आणि उत्पन्नाचे महत्व कळू लागले. त्यामुळे जादूच्या पिशवीचे वापर न करता गावातील तरुणांना शेतीचे महत्व पटवून सांगू लागला. अडीअडचणीच्या वेळी तो सर्वांना मदत करू लागला. यामुळे गावातील सर्वच लोकं त्याला मान देऊ लागले. परीने दिलेली जादूची पिशवी आज ही त्याच्याजवळ आहे. त्या जादूच्या पिशवीत दुसरे तिसरे काही नव्हते तर श्रम करण्याची

ताकद आणि स्वतःमधला आत्मविश्वास होता. जे की विजय विसरला होता, ते या जादूच्या पिशवीने त्याला परत मिळवून दिले. आज ही विजय जेंव्हा उदास होतो त्यावेळी त्या जादूच्या पिशवीत हात टाकतो आणि आपली इच्छा पूर्ण करवून घेतो.

# 17) एक मताची किंमत

आज रामराव खुपच चिंताग्रस्त होऊन बसला होता. कोणत्याही कामात त्याचे मन लागत नव्हते. त्याला शेतातील पिकाची काळजी लागली होती. त्याला आपल्या सर्जा आणि राजा या दोन बैलाची काळजी लागली होती. नव्हे त्याला परिवारातील सर्वांची काळजी लागली होती. कारण पावसाळा सुरु होऊन महिन्याचा काळ संपला होता तरी मनासारखा पाऊस अजुन तरी पडला नव्हता. थोड्या पावसाने रामरावने शेती पेरली होती. पीके ही जोमाने लहरत होती. पिकांची वाढ चांगली झाली होती मात्र पिकांना कसदार फळे येण्यासाठी पाण्याची खरी गरज होती. आभाळात रोजच काळे ढग येत होते मात्र पावसाचा एक ही थेंब जमिनीवर पडत नव्हता. हवामान खात्याकडून सांगितले जायचे तुरळक ठिकाणी पाऊस पडणार ! पण पाऊस कुठे पडला हे ऐकण्यात सुध्दा येत नव्हते. असे म्हटले जाते की श्रावण महिन्यात खुप पाऊस पडतो, एक दोन दिवस मुसळधार पडतो. म्हणून रामरावला श्रावण महिन्यावर पूर्ण भरोसा होता. पण या महिन्यात पाऊस तर सोडा उन्हाळ्यासारखे कडक उन पडू लागले. पीके करपू लागली तशी अजुन काळजी वाटू लागली. यावर्षी रामरावने

आपल्या बायकोच्या अंगावरील घरातील सोने गहाण ठेवून बियाणे आणि औषधी खरेदी केले होते. त्याची वेगळी काळजी त्याला खात होती. आत्ता काय करावे? रोज त्याला प्रश्न पडत होता. शेतात जात होता माना खाली टाकलेल्या पिकांना पाहून त्याचे मन हेलावून जात होते. देवाला करुण अंतःकरणाने हाक मारीत होता ' देवा एक दिवस पाऊस म्हणून येऊन जा '. पोळयाचे दिवस जवळ येत होते. श्रावणातील नागपंचमी आणि रक्षाबंधन सण असे तसेच साजरे झाले. घरात स्मशान शांतता होती. यावर्षी पोळयाला सर्जा-राजा ला रंग लावण्यास देखील रामरावची हिम्मत होत नव्हती. बैलाला सजवावे असे मन मानत नव्हते. यावर्षी पोळयावर दुष्काळाचे सावट असल्याचे बातम्या देखील वृतमानपत्रातून झळकले. बातमी वाचून रामरावच्या डोळयात पाणी आले. यावर्षी पीके आपल्या हातून जाणार हे नक्की होते. त्यादिवशी रामराव असाच रेडियो ऐकत बसला होता की आकाशवाणीवरुन एक सूचना देण्यात आली. पुढील दोन दिवसांत मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे, तरी नागरिकांनी काळजी घ्यावी. ही बातमी ऐकून रामरावला आनंद ही वाटले आणि दुःखही कारण हवामान खात्याचा अंदाज म्हणजे रामभरोसे असते. पण यावेळी तसे झाले नाही. दुसऱ्या दिवशी सकाळी आकाशात काळे ढग जमा झाले. सूर्यदर्शन झाले नाही. भरपूर पाऊस पडणार अशी एकदंरीत

परिस्थिती होती. मात्र एक ही थेंब न पडता दिवस संपला. परत एकदा हवामान खात्यावरचा रामरावचा पूर्ण विश्वास उडाला होता. चार दिवसावर पोळ्याचा सण होता. देवाने रामरावची आर्त हाक ऐकली होती म्हणून आकाशवाणीच्या तिसऱ्या दिवशी सकाळ पासून जे पावसाला सुरुवात झाली ते दुसऱ्या दिवशी सकाळपर्यंत चालूच होती. पाऊस पडताना पाहून रामरावला खुप आनंद होत होता. या पावसाने सर्वांचे प्रश्न सोडविले होते. शेतातील पीके वाचली होती. सर्व खड्‌यात पाणी जमा झाले त्यामुळे जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मिटला होता. नदी नाले तुडूंब झाली त्यामुळे माणसासाठी लागणाऱ्या पाण्याचा प्रश्न देखील संपला होता. रामरावचे नाही तर समाजातील सर्वांचे प्रश्न या एका पावसाने संपविले. म्हणून रामराव आजच्या पोळयाला आपल्या सर्जा आणि राजा बैलाला खुप सजवून वाजत गाजत नाचत नाचत पोळा सण साजरा केला. पाऊस उशिरा पडला मात्र वेळेवर पडला म्हणून त्यावर्षी रामरावला शेतातून चांगले उत्पादन मिळाले. आपल्या बायकोचे दागिने देखील त्याने सोडवून घेतले. त्याला कशाचीही काळजी नव्हती. गावात ग्रामपंचायतीचे वारे वाहत होते. सरपंच पदाच्या निवडणुकीसाठी थेट मतदान पद्धतीने मतदान होणार होते. त्यामुळे रामराव पाटलाचे मित्र त्यांना या निवडणुकीसाठी उभे राहण्याची मागणी लावून धरली. सर्वांच्या मागणीला मान देऊन

रामरावांनी निवडणुकीमध्ये भाग घेतला. तसे तर त्यांना निवडणुकीत हिरीरीने सहभाग घेत असत. निवडणुकीचा धुरळा सुरू झाला. शेतातील सर्व कामे बाजूला करून रामराव पूर्ण वेळ निवडणुकीमध्ये वेळ देऊ लागले. ऐन पेरणीच्या दिवसांत ही निवडणूक आली होती. रामराव दिवसभर निवडणुकीच्या प्रचारात फिरत राहिले आणि शेताच्या कामाकडे साफ दुर्लक्ष झाले. आपणच विजयी होऊ आणि गावाचे सरपंच देखील आपणच होऊ असा त्यांना विश्वास होता. महिनाभर चाललेली निवडणूक प्रक्रिया एकदाची संपली. या काळात शेत ओसाड पडले होते. दुसऱ्या दिवशी तालुक्याच्या ठिकाणी निवडणुकीचा निकाल होता. सुरुवातीला एका एका वार्ड च्या सदस्यांचे निकाल लागत होते. विजयी उमेदवार 'डोल ताशांच्या गजरात गुलाल उधळत होता तर हरलेला उमेदवार खाली मान घालून गायब होत होता. शेवटी सरपंच पदाची मतमोजणी चालू झाली. एक एक फेरी पूर्ण होत होती तशी रामरावांच्या मनात धाकधूक चालू झाली. एकूण चार फेऱ्या होणार होत्या. तिसऱ्या फेरीत रामराव फक्त 60 मतांनी मागे होते. आपला विजय नक्की असे त्यांना वाटत होते. पण चौथ्या फेरीनंतर निकाल घोषित करण्यात आला तेंव्हा रामरावांचा फक्त एका मतांनी पराभव झाले होते. हाता तोंडाशी आलेला विजय निसटून गेला होता. त्यामुळे खूपच नाराज होऊन रामराव आणि त्यांचे मित्र

निवडणूक हरल्याच्या दुःखात धाब्यावर जाऊन दारू पीत बसले. रात्री उशिरा घरी परतले. निवडणूक हरल्याची बोच त्याच्या मनाला लागली होती. म्हणून तो रोज सायंकाळी दारू पिऊ लागला. शेताची तर पुरी वाट लागली होती. जवळचे पैसे संपले म्हणून परत एकदा बायकोचे दागिने गहाण ठेवण्याची वेळ आली. यावेळी बायकोने मात्र दागिने देण्यास नकार दिला त्यावेळी दोघांचे खूप मोठे भांडण झाले. ती आपल्या लेकरांना घेऊन माहेरी निघून गेली. इकडे रामरावांची अवस्था दिवसेंदिवस बिघडत चालली होती. एके दिवशी दारू पिऊन घरी परत येतांना रस्त्यात अपघात झाला आणि त्यात रामराव जागेवरच खल्लास झाले. या निवडणुकीमुळे माझ्या नवऱ्याचा जीव गेला म्हणून रामरावांची बायको दरवेळी शिव्याशाप तर देतेच शिवाय ती कधीही मतदान करायला देखील जात नाही. आज मुलाचे नाव मतदान यादीत आले होते आणि त्याला मतदान करण्यास त्याची आई विरोध करत होती. पण मुलाने आईला मतदानाचे महत्व समजावून सांगितले की, त्यावेळी काही लोकं जर बाबांना मतदान केले असते तर बाबा विजयी झाले असते. निवडणुकीत एक एक मतदान अत्यंत मोलाचे आहे. त्यामुळे चल आपण मतदान करू असे म्हणून ते दोघे मतदान केंद्राकडे रवाना झाले.


# 18) कुस्ती

दरवर्षी रामनवमीला टाकळी येथे खूप मोठी जत्रा भरते. सुमारे नऊ दिवस येथे यात्रा भरविली जाते. अनेक लहान मोठे खेळणीचे दुकानं आणि विविध खेळ त्याठिकाणी आलेली असतात. आकाशपाळणा आणि तंबूमधील सिनेमा पाहण्याची मजा काही औरच असते. टाकळीच्या गावाची जत्रा म्हणजे आजूबाजूच्या लोकांसाठी एक पर्वणी असायची. टाकळी येथून दीड किमी अंतरावर असलेल्या गुजरी येथील बाबू त्या जत्रेत आपल्या मित्रांसोबत जातो. सर्व खेळ खेळून झाल्यावर रामनवमीच्या शेवटच्या दिवशी त्याठिकाणी कुस्तीच्या स्पर्धेचे आयोजन केल्या जाते. सायंकाळी सूर्य अस्ताला जाण्याच्या वेळेत कुस्तीला प्रारंभ होते. बाबू आणि त्याचे मित्र कुस्ती पाहण्यासाठी जातात. बाबूला कुस्तीची थोडी ओळख असते आणि त्यात त्याला रस ही असते. मनात विचार करतो की आपण ही एक कुस्ती खेळावी. मग तो ही मैदानात उतरतो आणि एक कुस्ती खेळतो. कुस्तीचे एक-दोन डावपेच त्याला माहित असल्यामुळे समोरच्या पहिलवानाला क्षणात चित करतो, त्यात त्याला वीस रुपये मिळतात. हा खेळ चालू असताना तेथे टाकळी गावातील शाळेचा शिक्षक त्याचा

खेळ पाहून आनंदित होतो. त्याच्याजवळ जाऊन त्याची चौकशी व विचारपूस करतो. तेंव्हा बाबू आपली पूर्ण माहिती सांगतो. त्याचे सातवी पर्यंतचे शिक्षण झाले असून पुढील वर्षी आठव्या वर्गात शिकण्यासाठी बाहेरगावी जायचे आहे असे सांगितले. त्यावर त्या गुरुजींनी त्याला पुढील वर्षी आठव्या वर्गात टाकळीच्या शाळेत प्रवेश घेण्यासाठी सांगतो. बाबू देखील आनंदात उड्या मारत घरी जातो. कुस्तीच्या स्पर्धेत वीस रुपये जिंकून आलो असे आपल्या आईला मोठ्या अभिमानाने सांगतो. आईला देखील बाबूच्या या कामाचे खूप कौतुक वाटते. जून महिना उजाडतो. तसा तो आपली टीसी आणि मार्कमेमो घेऊन टाकळीच्या शाळेत जातो. कुस्ती खेळतांना भेटलेले शिंदे सर तिथे होते. त्यांच्या मार्फत आठव्या वर्गात तो त्या शाळेत प्रवेश घेतो. शिंदे सर हे पिटी शिकविणारे असतात व ते खेळाचे शिक्षक असतात. त्यांनी बाबूला विविध खेळासोबत कुस्तीचे अनेक डावपेच शिकवितात. पावसाळी क्रीडा स्पर्धेत बाबू भाग घेतो आणि तालुका पासून ते जिल्ह्यास्तरावर आपली कामगिरी दाखवितो. कुस्तीच्या स्पर्धेत तो जिल्ह्यात पहिल्या क्रमांकावर येतो. त्यांच्या या खेळामुळे गावाचे आणि शाळेचे नाव जिल्ह्यात सर्वदूर पसरते. दहाव्या वर्गात शिकत असतांना कुस्ती स्पर्धेत त्याची विभागस्तरावर निवड होते. तेथे देखील कुस्तीच्या स्पर्धेत अव्वल क्रमांक मिळवून आपल्या

शाळेचे नाव कमावितो. हळूहळू त्याचे नाव विभागात सर्वदूर पसरते. पण त्याच्यासोबत एक वाईट घटना घडते ते म्हणजे तो दहावीच्या परीक्षेत नापास होतो. कुस्ती खेळण्याच्या नादात तो अभ्यासाकडे लक्षच देत नाही. सुरुवातीपासून त्याचे गणित आणि इंग्रजी हे विषय खूपच कच्चे होते. दोन-तीन वेळा परीक्षा देऊन पाहिला पण त्याला काही यश मिळाले नाही. येथूनच त्याच्या जीवनाला वेगळी कलाटणी मिळाली. त्याला आता कोणत्याच शाळा महाविद्यालय मधून त्याला खेळायला मिळत नव्हते. आपली कुस्ती खेळण्याची भूक भागवावी म्हणून तो विविध गावात भरल्या जाणाऱ्या जत्रेच्या ठिकाणी खेळायला जाऊ लागला. टाकळी ची जत्रा त्याची घरची बनली होती. दरवर्षी पहिलं बक्षीस त्याच्याच नावाने ठरवलेलं असल्याचे. त्याची कुस्ती खेळण्याची पद्धत पाहून सारेच परेशान होत असे. त्या पंचक्रोशीत त्याला हरवणारा कोणी तयार झाला नव्हता. पण बोरगाव येथे दिवाळी निमित्ताने एक भव्य कुस्ती स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. त्या स्पर्धेत राज्यातील अनेक मल्ल त्याठिकाणी आले होते. त्याठिकाणी बाबू कुस्ती खेळण्यासाठी मैदानात उतरतो. त्या कुस्तीत त्याला दगा होते आणि समोरचा पहिलवान जास्तच हुशार आणि तगडा होता. कुस्ती खेळताना बाबूचे हात मोडले जाते. बाबू जोरजोरात ओरडतो लगेच तेथील पंच आणि इतर लोकं त्यांची

सोडवणूक करतात. तेथून बाबूला दवाखान्यात नेतात. त्याच्या दोन्ही हाताला प्लॅास्टर बांधल्या जाते. डॅाक्टर सक्त सूचना देतात की यापुढे कुस्ती खेळायचे नाही. याच ठिकाणी बाबूच्या मनातील सर्व स्वप्न संपून जातात. शिंदे सर त्याची दवाखान्यात जाऊन भेट घेतात. बाबूला अश्या अवस्थेत पाहून शिंदे सर खूप उदास होतात आणि तेथून निघून जातात.























**नासा येवतीकर**

यांची ई साहित्यवरील पुस्तके

कव्हरवर एक क्लिक करा आणि अख्खं पुस्तकच हजर.






**ई साहित्य प्रतिष्ठानचं हे तेरावं वर्षं.**

**नासा येवतीकर यांचं ई साहित्यवर हे दहावं पुस्तक.**

नासा येवतीकर हे नांदेडच्या ग्रामीण भगातील शिक्षक. विद्यार्थ्यांप्रती शिकवण्याची व विकासाची प्रचंड तळमळ, देशप्रेम आणि उपजत दैवी प्रतिभा यांचे फ़ळ म्हणजे त्यांचे लेखन. ते समाज सुधारण्याच्या हिरीरीने लेहीतात. एक जोमदार ऊर्जा त्यांच्या लेखनात असते. पण अशा लेखकांना योग्य प्रकाशक मिळणं कठीण जातं. एकतर ग्रामीण महाराष्ट्रात प्रकाशक कमीच. त्यात लेखक प्रसिद्ध नसल्यामुळे त्यांची पुस्तकं कितीही चांगली असली तरी विकली जात नाहीत. त्यामुळे प्रकाशक नवीन लेखकांची पुस्तकं छापत नाहीत. कधीकधी तर न वाचताच परत करतात. आणि प्रकाशन झालेच नाही तर हे नवीन लेखक प्रसिद्ध होणार कसे? या दुष्टचक्रात अनेक प्रतिभा गर्भातच मारल्या जातात. अगदी “मृत्युंजय”कार शिवाजी सावंत यांचं पुस्तक तीन वर्षं कोणी प्रकाशक वाचूनही पहात नव्हता. या दुष्टचक्रातन अनेक तरूण लेखकांच्या पिढ्या बरबाद झाल्या.

आता नेटवर नवलेखकांना वाचकांपर्यंत पोहोचवण्याचे काम अनेक संस्था करत आहेत. ई साहित्य प्रतिष्ठान त्यातील एक. ५ लाखांहून अधिक वाचकांपर्यंत या नवीन लेखकांना नेण्याचे काम ही संस्था करते. पूर्ण विनामूल्य. लेखकांनाही कोणताही खर्च नाही.

भविष्य काळात लेखकांना भरघोस मानधन देण्याची ई साहित्यची इच्छा आहे. नवीन उत्कृष्ट लेखक ई साहित्याकडे वळत आहेत. त्यांना प्रतिसादही मिळतो. कुणाला भरघोस स्तुती तर काहींच्या वाट्याला टीकाही येते. या टीकेला positively घेऊन हे लेखक आपला कस वाढवत नेतात. सुरूची नाईक, प्रफ़ुल शेजव, भाग्यश्री पाटील, कोमल मानकर, सुरज गाताडे, अनुप साळगावकर, बाळासाहेब शिंपी, चंदन विचारे, सौरभ वागळे, यशराज पारखी, चंद्रशेखर सावंत, संयम बागायतकर, ओंकार झांजे, पंकज घारे, विनायक पोतदार, चंद्रकांत शिंदे, निरंजन कुलकर्णी, चारुलता विसपुते, कार्तिक हजारे, गणेश सानप, मनोज चापके, महेश जाधव, मनोज गिरसे, मृदुला पाटील, निलेश देसाई, सनहा पठाण, संजय बनसोडे, संजय येरणे, शंतनू पाठक, श्रेणिक सरडे, शुभम रोकडे, सुधाकर तळवडेकर, दिप्ती काबाडे, भूपेश कुंभार, सोनाली सामंत, केतकी शहा, विनिता देशपांडे, सौरभ कोरगांवकर, मिलिंद कुलकर्णी, शुभम पाटील, आशिष कर्ले, सुरेंद्र पाथरकर, प्रीती सावंत दळवी, निमिष सोनार, उमा कोल्हे, गणेश ढोले, सचिन तोडकर, महेश पाठाडे, अभिजीत पैठणपगारे, कार्तिक हजारे, किरण दशमुखे, जगदिश खांदेवाले, माधुरी नाईक, विशाल दळवी, गौरी कुलकर्णी, जितेश उबाळे, प्रितम साळुंखे, स्वीटी महाले, अंबरीश गुरव, अविनाश जामदार, गौरव नायगांवकर, प्रणिता ठाकूर, अनिल पिसे, अनामिका बोरकर, पवन सोनवणे, राजेंद्र

शेळके, पुर्वा राउत, धनंजय कलमष्टे, वैभव तांबटकर, बाळासाहेब शिंपी, नासा येवतीकर, सुजाता सिद्धा असे अनेक तरूण लेखक सातत्यपूर्ण लेखन करत आहेत.

मराठीत हौशी लेखकांची कमी कधीच नव्हती. आता हौसेच्या वरच्या पायरीवरचे, लेखनाकडे गंभीरपणे पहाणारे, आपल्या लेखनाला पैलू पाडण्याकडे लक्ष देणारे तरूण लेखक येत आहेत. ही नवीन लेखकांची फ़ौज मराठी भाषेला नवीन प्रकाशमान जगात स्थान मिळवून देतील. त्यांच्या साहित्याच्या प्रकाशाला उजाळा मिळो. वाचकांना आनंद मिळो. मराठीची भरभराट होवो. जगातील सर्वोत्कृष्ट साहित्यिक प्रसवणारी भाषा म्हणून मराठीची ओळख जगाला होवो.

या सर्वात ई साहित्याचाही खारीचा वाटा असेल हा आनंद.

या यशात ई लेखकांचा सिंहाचा वाटा असेल याचा अभिमान.

बस्स. अजून काय पाहिजे?

www.esahity.com

www.esahity.in

esahity@gmail.com